


# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com




* वर्ष ६३ वे * अंक ३१४ * नांदेड * गुरूवार, दि. २१ नोव्हेंबर २०२४ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# लोकसभा पोटनिवडणुकीसाठी ६२.८९ तर विधानसभेसाठी ६४.९२ टक्के मतदान

- दिव्यांग, जेष्ठ व नवमतदारांनी केले उत्साहात मतदान
- लोकप्रतिनिधीसह मान्यवरांनी बजावला मतदानाचा हक्क
- सखी व पर्यावरणपूरक मतदान केंद्रांनी वेधले लक्ष
- शहरासह ग्रामीण मतदारांमध्ये मतदानाचा उत्साह
- २३ नोव्हेंबरला लोकसभा व ६ विधानसभेची विद्यापीठात मतमोजणी

**नांदेड–** नांदेड लोकसभा पोटनिवडणूक व ९ विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी ३ हजार ८८ मतदान केंद्रावर शांततेत मतदान पार पडले. यामध्ये लोकसभा पोटनिवडणुकीसाठी ६३.८९ तर विधानसभेसाठी ६४.९२ टक्के मतदान झाले आहे. मतदारांनी मतदान केंद्रावर सकाळी ७ वाजेपासून लांबच लांब रांगा लावल्या होत्या. दिव्यांग, जेष्ठ मतदारासोबत नवम तदार आणि तृतीयपंथीयांनी मतदानासाठी उपस्थिती लावली. यावर्षी २५ वर्षानंतर एकाच वेळी लोकसभा व विधानसभेसाठी एकाच शाईत दोन मतदान करण्याचा अनुभव मतदाराना मिळाला.

या निवडणुकीत लोकसभेसाठी १९ तर विधानसभेसाठी १६५ उमेदवारांचे भविष्य बुधवारी मतदान यंत्रात बंद झाले आहे. या लोकसभेसाठी १९ लाखांच्यावर व विधानसभेसाठी २७ लाखांच्यावर मतदारांचा समावेश आहे. सकाळी नांदेड जिल्ह्यामध्ये ५ सकाळी ७ वाजता मतदानाला सुरुवात झाली. काही ठिकाणी सकाळपासूनच मतदानासाठी नागरिकांनी गर्दी केली होती.

नांदेड लोकसभेसाठी आज सकाळी ९ वाजता ६.०३ तर विधानसभेसाठी ५.४२ टक्के मतदान झाले. सकाळी नांदेड मतदार संघातील लोकप्रतिनिधीनीसह अनेक मान्यवरांनी मतदानाचा हक्कर बजावला. जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी सहकुटूंब व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनीही आयटीआय परिसरातील कामगार कल्यान केंद्रावर मतदानाचा हक्क बजावला. नवमतदार, जेष्ठ नागरिक, दिव्यांग नागरिक, तृतीयपंथीय यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला असून त्यांनी मोठया प्रमाणात मतदानाचा हक्क बजावला.

सकाळी ११ वाजेपर्यंत लोकसभेसाठी १२.५९ तर विधानसभेसाठी १३.६७ टक्के म तदान झाले. आज दुपारी १ वाजता २७.२५ तर विधानसभेसाठी २८.१५ टक्के मतदान झाले. दुपारी ३ वाजेपर्यंत लोकसभेसाठी ४१.५८ तर विधानसभा क्षेत्रात ४२.८७ टक्के मतदान झाले होते. सायं. ५ वाजेपर्यंत ही आकडेवारी लोकसभेसाठी ५३.७८ तर विधानसभेसाठी ५५.८८ एवढी होती.

या निवडणुकीसाठी गेल्या ४० दिवसापासून जिल्हा प्रशासन कार्यरत आहे. १५ हजार कर्मचारी तसेच पोलीस व राखीव दलाच्या तुकडया गेल्या काही दिवसांपासून कार्यरत होत्या. आज दिवसभर वॉर रुम व वेबकास्टिंग कक्षाच्या माध्यमातून जिल्हाधिकारी अभिजीत राऊत निवडणूक आयोग व सामान्य मतदार यांच्या संपर्कात होते. वेब कास्टिंग विभागात वरिष्ठ अधिकारी निगराणी ठेवून होते. रात्री उशिरापर्यत या यंत्रणेमार्फत अनेक ठिकाणच्या मतदान केंद्रावर लक्ष ठेवून होते.

बुधवारी मतदान पार पडल्यानंतर दोन दिवसांनी २३ नोव्हेंबरला शनिवारी नांदेड येथील स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठात होणार असून किनवटला आयटीआय कॉलेजमध्ये, हदगावला समाज कल्याण भवन येथील अनुसूचित जातीचे मुलींचे शासकीय वसतीगृह तर लोहा येथे महसूल हॉल, तहसिल कार्यालयाच्या ठिकाणी मतमोजणी होणार आहे.

### विधानसभा निहाय झालेले मतदान

भोकर ८५– ७५. ०१, देगलूर ९०– ५९.७५, हदगाव ८४– ७०. ४०, किनवट ८३– ७०.०५, लोहा ८८– ६७. ६१, मुखेड ९१– ५९. ७८, नायगाव ८९– ६९. ५०, नांदेड उतर ८६– ५६.०५, नांदेड दक्षिण ८७– ५८.०२ टक्के.

### लोकसभा पोटनिवडणुकीसाठी झालेले मतदान

भोकर ७५. ० १, नांदेड उत्तर ५६. ६५, नांदेड दक्षिण ५८. ०२, नायगाव ६९.० ५, देगलूर ५९. ७५, मुखेड ५९. ७८ टक्के.

# महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी ६५.११ टक्के मतदान



**मुंबई–** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी राज्यात सायंकाळी ६ वाजेपर्यंत राज्यात सरासरी ६५.११ टक्के मतदान झाले आहे.

यामध्ये अहमदनगर – ७१.७३ टक्के, अकोला – ६४.९८ टक्के, अमरावती – ६५.५७ टक्के, औरंगाबाद– ६८.८९ टक्के, बीड – ६७.७९ टक्के, भंडारा – ६९.४२ टक्के, बुलढाणा – ७०.३२ टक्के, चंद्रपूर– ७१.२७ टक्के, धुळे – ६४.७० टक्के, गडचिरोली – ७३.६८ टक्के, गोंदिया – ६९.५३ टक्के, हिंगोली – ७१.१० टक्के, जळगाव – ६४.४२ टक्के, जालना – ७२.३० टक्के, कोल्हापूर – ७६.२५ टक्के, लातूर – ६६.९२ टक्के, मुंबई शहर– ५२.०७ टक्के, मुंबई उपनगर –५५.७७ टक्के, नागपूर – ६०.४९ टक्के, नांदेड – ६४.९२ टक्के, नंदुरबार– ६९.१५ टक्के, नाशिक – ६७.५७ टक्के, उस्मानाबाद – ६४.२७ टक्के, पालघर – ६५.९५ टक्के, परभणी – ७०.३८ टक्के, पुणे – ६१.०५ टक्के, रायगड – ६७.२३ टक्के, रत्नागिरी – ६४.५५ टक्के, सांगली – ७१.८९ टक्के, सातारा – ७१.७१ टक्के, सिंधुदुर्ग – ६८.४० टक्के, सोलापूर – ६७.३६ टक्के, ठाणे – ५६.०५ टक्के, वर्धा – ६८.३० टक्के, वाशिम – ६६.०१ टक्के, यवतमाळ – ६९.०२ टक्के मतदान झाले आहे.

गेल्या वेळी २०१९ च्या विधानसभेला ६१.४४ टक्के मतदान झाले होते. मतदानाचा पाच वाजेपर्यंतचा आकडा पाहता २०१९ चा आकडा पार होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. असे झालेच तर जादाचे झालेले हे मतदान कोणाच्या पारड्यात, सत्ताधाऱ्यांच्या विरोधात की सत्ताधाऱ्यांच्या बाजुने असेल याचे अंदाज लावले जाणार आहेत.

# झारखंडमध्ये दुसऱ्या टप्प्यात ६७ टक्क्यांहून जास्त मतदान

**नवी दिल्ली–** झारखंड विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या आणि अंतिम टप्प्यातील ३८ जागांवर मतदान प्रक्रिया सुरू झाली आहे. या टप्प्यात एकूण ५२८ उमेदवार रिंगणात आहेत. ३ मतदान केंद्रांवर सकाळी ७ ते सायंकाळी ४ या वेळेत मतदान होणार आहे. याशिवाय उर्वरित मतदान केंद्रांवर सायंकाळी ५ वाजेपर्यंत मतदान होणार आहे. सर्व बुथवर कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली असून १ कोटी २३ लाख ५८ हजार १९५ लोक मतदान करणार आहेत. संथाल परगाणाच्या १८ जागांवर, उत्तर छोटानागपूरच्या १८ जागांवर आणि दक्षिण छोटानागपूरच्या २ जागांवर मतदान होणार आहे. तर, संध्याकाळी ५ वाजेपर्यंत झारखंड मध्ये ६७.५९ टक्के मतदान झाले.

भाजपा खासदार निशिकांत दुबे यांनी झारखंड विधानसभा निवडणुकीदरम्यान देवघर जिल्ह्यातील मधुपूर विधानसभा मतदारसंघातील बूथ क्रमांक १११ वर पीठासीन अधिकाऱ्याने कथित गैरवर्तन केल्याबद्दल निवडणूक आयोगाकडे तक्रार केली आहे. झारखंड मुक्ती मोर्चा (जेएमएम) उमेदवार आणि मंत्री हाफिझुल हसन यांच्या बाजूने अधिकाऱ्याने पक्षपातीपणा दाखवला, असा दावा दुबे यांनी केला. या तक्रारीनंतर, निवडणूक आयोगाने त्वरीत कारवाई करत संबंधित पीठासीन अधिकाऱ्याला अटक केली. देवघर येथे पत्रकारांशी बोलताना दुबे यांनी या घटनेला दुजोरा दिला.

सत्ताधारी जेएमएम काँग्रेस युतीची भाजपा आणि त्याचा स्थानिक ऑल झारखंड स्टुडंट्स यूनियन पार्टी यांच्याविरोधात सामना आहे. मुख्यमंत्री हेमंत सोरेन हे बऱ्हेतमध्ये भाजपाच्या गमालीएल हेम्ब्रोम यांच्याशी तर त्यांची पत्नी कल्पना सोरेन या गांडेमध्ये भाजपाच्या मुनिया देवी यांच्याशी लढत होणार आहे. भाजपाचे माजी मुख्यमंत्री बाबूलाल मरांडी धनवार जागेवर सीपीआय एलचे राजकुमार यादव यांच्याकडून निवडणूक लढवणार आहेत. याशिवाय राजकीय दिग्गज शिबू सोरेन यांची सून सीता सोरेन यांचा जामतारा येथे काँग्रेसच्या इरफान अन्सारी यांच्याशी सामना होणार आहे.

झारखंडमध्ये १४ हजार २१८ मतदान केंद्रे असून त्यात २३९ मतदान केंद्रे हे महिलांकेंद्रित आहेत. दरम्यान, निवडणूक आयोगाने आदर्श आचारसंहिता लागू केल्यापासून २०० कोटी रुपयांची अवैध रोकड आणि साहित्य जप्त केले आहेत.

# बारामतीत मतदान केंद्रावर राडा

**पुणे–** मतदारांच्या हाताम ध्ये घड्याळाचे चिन्ह असलेल्या चिठ्ठ्या आढळून आल्याने बारामतीत राष्ट्रवादी अजित पवार पक्ष आणि राष्ट्रवादी शरद पवार पक्षाच्या कार्यकर्त्यांमध्ये बारामतीत बाचाबाची आणि दमबाजीचा प्रकार घडला. त्यामुळे बारामती शहरातील वातावरण गंभीर झाले.

बारामती शहरातील बालक मंदिर येथील मतदान केंद्रावर हा प्रकार घडला. या मतदान केंद्रावर येणाऱ्या मतदारांच्या हातामध्ये घड्याळाचे चिन्ह असलेल्या चिट्ट्या आढळून आल्या. ही बाब राष्ट्रवादी शरद पवार गटातील कार्यकर्त्यांच्या लक्षात येताच त्यांनी यावर आक्षेप घेतला. यावरून दोन्ही गटात बाचाबाची होऊन एकमेकांना दमबाजी करण्यात आली. ही बाब महाविकास आघाडीचे उमेदवार युगेंद्र पवार यांच्या आई शर्मिला पवार यांना समजली असता त्या केंद्राच्या ठिकाणी आल्या.

हा आरोप खोटा आहे. तसे झालेले असेल तर सीसीटीव्ही कॅमेरामध्ये ते रेकॉर्ड झालेले असेल. निवडणूक आयोग बघेल. आज आम्ही एवढ्या निवडणुका पार पाडल्या. मात्र कधीही आमच्या कार्यकर्त्यांनी अशा पद्धतीने कधीही वक्तव्य केलेली नाहीत. आम्ही सुसंस्कृत महाराष्ट्र मध्ये राहत असून, सुसंस्कृतपणा दाखवतो. शाहू फुले आंबेडकरांची आमची विचारधारा आहे. त्यामुळे माझा कार्यकर्ता असे करणार नाही. असा माझा माझ्या कार्यकर्त्यावर ठाम विश्वास आहे. असे उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले.

# मतदान करून परत येत असताना कराळे मास्तरांना मारहाण

**वर्धा–** राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाचे प्रदेश प्रवक्ता नितेश कराळे मास्तरांना मारहाण झाल्याची घटना घडली. कराळे मास्तरांच्या मांडवा या गावात त्यांना मारहाण करण्यात आली. भाजपच्या कार्यकर्त्यांनी आपल्याला मारहाण केल्याचा आरोप कराळे मास्तरांनी केला. या प्रकरणाचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. मारहाण झाल्यानंतर कराळे मास्तरांनी वर्ध्यातील सावंगी पोलिस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवली आहे. या प्रकरणानंतर काही काळ तणावाचं वातावरण निर्माण झाल्याचं दिसून आलं. वर्ध्यातील मांडवा या गावातून मतदान करून परत येत असताना कराळे मास्तरांना ही मारहाण झाली.

# मतदान संपताच संभाजीराजेंच्या उमेदवारास अटक, ३०७ चा गंभीर गुन्हा दाखल

**मुंबई–** राज्यातील विधानसभा निवडणुकांसाठी मतदान प्रकिया पार पडली. बीडसह काही जिल्ह्यातील वादाच्या घटना वगळता राज्यात शांततेत आणि उत्साहात मतदान पार पडले. मात्र, मंत्री धनंजय मुंडेंच्या परळी मतदारसंघात काही ठिकाणी राडा झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. याशिवाय आता ऐरोली विधानसभा मतदारसंघातही माजी खासदार व स्वराज्य पक्षाचे संस्थापक संभाजीराजेंच्या स्वराज्य पक्षाचे उमेदवार आणि भाजप भाजपमध्ये जुंपल्याचं पाहायला मिळालं. विशेष म्हणजे याप्रकरणी ऐरोली विधानसभा मतदारसंघाचे उमेदवार अंकूश कदम यांच्यावर ३०७ सारखा गंभीर गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना अटकही करण्यात आली आहे.

कोपरखैरणे येथे भाजप कार्यकर्त्याला मारहाण केल्याप्रकरणी अंकूश कदम यांच्यावर ३०७ अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे. अंकुश कदम यांच्यासह ३० ते ३५ कार्यकर्त्यावर गुन्हा दाखल करण्यात आल्याने येथील मतदारसंघात वातावरण तणावाचं बनलं आहे. ऐरोली विधानसभा मतदारसंघात यंदा चौरंगी लढत होत असून भाजप महायुतीकडून गणेश नाईक हे उमेदवार आहेत. तर, शिवसेना ठाकरे गटाकडून एम.के.मढवी यांना मैदानात उतरवण्यात आलं आहे. विजय चौगुले हे अपक्ष उमेदवार असून परिवर्तन महाशक्ती या तिसऱ्या आघाडीमधील स्वराज्य पक्षाचे उमेदवार अंकुश कदम हे आहेत.



**नांदेड** : मतदानाचा हक्क बजाविल्यानंतर माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण, माजी आमदार अमिताताई चव्हाण, भोकरच्या भाजप उमेदवार श्रीजया चव्हाण तसेच सुजया चव्हाण. दुसऱ्या छायाचित्रात लोहा-कंधार महायुतीचे उमेदवार माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर, त्यांच्या पत्नी प्रतिभाताई चिखलीकर व प्रणिताताई देवरे-चिखलीकर. तिसऱ्या छायाचित्रात आमदार हेमंत पाटील यांचे कुटूंबासहीत मतदानाचा हक्क बजाविल्यानंतरचे छायाचित्र. (छाया : करणसिंह बैस)



**नांदेड** : मतदानाचा हक्क बजाविल्यानंतर भाजपचे राज्यसभा खासदार डॉ. अजित गोपछडे व भाजप लोकसभेचे उमेदवार डॉ. संतुकराव हंबर्डे, आमदार बालाजी कल्याणकर, नांदेड उत्तरच्या शिवसेना ठाकरे गटाच्या उमेदवार संगीता पाटील डक, नायगावच्या काँग्रेस उमेदवार डॉ. मीनल पाटील खतगावकर, नांदेड दक्षिणचे काँग्रेस आमदार मोहनराव हंबर्डे, नांदेड दक्षिणचे शिवसेना उमेदवार आनंद तिडके बोंढारकर, नांदेड उत्तरचे काँग्रेस उमेदवार अब्दुल सत्तार, देगलूरचे भाजप उमेदवार जितेश अंतापूरकर हे दिसत आहेत.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकळ जन
संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ
गोदातीर समाचार
संपादक
केशव घोणसे पाटील

# बालविवाहाचा प्रश्न अनुत्तरीतच!

आपल्या देशामध्ये नेहमीच होणाऱ्या विविध प्रकारच्या निवडणुकांमुळे राजकीय पक्ष आणि त्यांच्या नेत्यांचे सगळे लक्ष निवडणूक जिंकणे, सत्तेवर येणे, सत्ता उपभोगणे याकडेच राहते. पण सत्तेवर आल्यावर देशातील मूलभूत प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी प्रयत्न करण्याकरिता त्यांच्याकडे वेळच शिल्लक राहत नाही आणि त्यातून त्यांना तशी इच्छाही नसते. यामुळे आपल्या देशामध्ये आजही अनेक प्रश्न अनुत्तरीत राहिले आहेत. त्यातील एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे बालविवाह. कायद्याने जरी बालविवाहावर बंदी आणलेली असली तरी प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी फारच अभावाने होते. यामुळे ही समस्या आजच्या एकविसाव्या शतकाच्या आधुनिक युगामध्ये सुद्धा उग्र झालेली आहे. त्यात पुन्हा धार्मिक कट्टरतेचे कारण पुढे करून बालविवाह सर्रासपणे लावले जातात. या संदर्भात अलीकडेच, देशाच्या सर्वोच्च न्यायालयाच्या तीन सदस्यीय खंडपीठाने एका प्रकरणात सांगितले की, कोणत्याही धर्माचा वैयक्तिक कायदा बालविवाह प्रतिबंधक कायद्याच्या मार्गात येऊ शकत नाही. याचाच अर्थ देशातील सर्व धर्मीयांना हा कायदा लागू आहे. न्यायालयाने म्हटले की, बालविवाहामुळे मुलांना त्यांचा आत्मनिर्णय, निवड, स्वायत्तता, आरोग्य आणि शिक्षण या अधिकारांपासून वंचित ठेवले जाते. सुप्रीम कोर्टाच्या या निर्णयाला विशेष महत्त्व आहे की, त्यामध्ये बाल-वर देखील चर्चेत आहेत. बालविवाह हे बालहक्कांचे उल्लंघन तर आहेच, शिवाय मुलांच्या जीवनावरही घातक हल्ला आहे, यात शंका नाही. याचा थेट परिणाम मुलांच्या शिक्षण, आरोग्य आणि सुरक्षिततेच्या अधिकारांवर होतो. साधारणपणे बालविवाहामागील प्रमुख कारणे म्हणजे गरिबी, निरक्षरता, पारंपरिक चालीरीती आणि मुलींची सुरक्षा. बालविवाहात ढकललेल्या मुलांना आयुष्यभर गरिबी आणि निरक्षरतेच्या चक्रात अडकून राहावे लागते. 'बार्कले इकॉनॉमिक रिव्ह्यू'मध्ये प्रकाशित झालेल्या 'बालविवाहाचे अर्थशास्त्र' या अभ्यासातून असे दिसून आले आहे की, बालविवाहामुळे शिक्षण सोडण्याची प्रवृत्ती मुलींना त्यांच्या आयुष्यभर चांगले वेतन मिळविण्याच्या संधींना बाधा आणते. बालविवाहामुळे त्यांची आर्थिक संसाधने मिळवण्याची क्षमता कमी होते. यामुळे ते प्रत्येक गरजेसाठी कुटुंबातील इतर सदस्यांवर अवलंबून असतात. या परिस्थितीमुळे त्यांचा आत्मविश्वास तर ढासळतोच, पण त्यांची निर्णयक्षमताही कमी होते. अशिक्षित असल्यामुळे मुलींना रोजगार देखील मिळत नाही. त्यामुळे ते कायम गरिबीत राहतात. पालकच आपल्या मुलांच्या आयुष्यात त्यांना बालविवाहाच्या बंधनात बांधून समस्या निर्माण करतात हे दुर्दैव आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या म्हणण्यानुसार, जागतिक स्तरावर १५-१९ वयोगटातील मुलींमध्ये गर्भधारणेदरम्यान आणि बाळंतपणातील गुंतागुंत हे मृत्यूचे प्रमुख कारण आहे. १५ वर्षांपूर्वी जन्म देणाऱ्या मुलींचा प्रसूतीदरम्यान मृत्यू होण्याची शक्यता २० वर्षांच्या मुलींपेक्षा पाच पटीने जास्त असते. बालवधू देखील इतर गर्भधारणा-संबंधित गुंतागुंतीसाठी अधिक असुरक्षित असतात, ज्याचे विनाशकारी दीर्घकालीन परिणाम होऊ शकतात. लहान वयात गर्भधारणा केल्याने केवळ मातांवरच नव्हे तर नवजात बालकांवरही घातक परिणाम होतात. बालविवाहाचा प्रश्न निर्माण झाला की, मुलींची प्रतिमा आपोआपच मनात निर्माण होते, पण हा भार मुलांवरही पडतो आणि मुलीं-प्रमाणेच त्यांनाही वयाच्या आधीच परिपक्व होण्याचे दुःख सहन करावे लागते. व्हल्नरेबल चिल्ड्रन अँड युथ स्टडीज या जर्नलमध्ये प्रकाशित 'चाइल्ड मॅरेज अमंग बॉयज ए ग्लोबल ओव्हरव्ह्यू ऑफ व्हेलेबल डेटा' हे संशोधन ८२ कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांतील घरगुती सर्वेक्षणांच्या डेटावर आधारित करण्यात आले आहे. असे आढळून आले की, २१ पैकी एका मुलाचे बालपणीच लग्न करण्यात आले होते. युनिसेफने २०१९ मध्ये केलेल्या एका अभ्यासात असे दिसून आले आहे की, जगभरातील सुमारे ११५ दशलक्ष मुलांचे वय १८ वर्षे पूर्ण होण्याआधीच लग्न झाले आहे. या आकड्यांसोबतच युनिसेफनेही अशा गोष्टींकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याबद्दल चिंता व्यक्त केली. पालकांचा निष्काळजीपणा जीवन नष्ट करू शकते. यामुळे लहान वयातच मुलांवर मोठ्यांच्या जबाबदाऱ्या आणि भूमिकांचे ओझे असते. त्यांच्यावरील सामाजिक आणि कौटुंबिक जबाबदाऱ्यांचे ओझे त्यांच्या मानसिक आरोग्यावर खोलवर परिणाम करतात. बालविवाह ही एक सामाजिक समस्या आहे ज्यासाठी कायदे आणि धोरण बनवण्यापेक्षा सामाजिक क्रांतीची गरज आहे.

# वाणीवैभवाचा उपयोग कशासाठी?

मनुष्य प्राप्त करू शकणाऱ्या चौसष्ट कलांपैकी वक्तृत्वकला ही सर्वात महत्त्वाची कला आहे. वाणीवैभव असणारी माणसे जगात सर्वात श्रीमंत असतात, मुखदुर्बलता असणारी व वायफळ चर्चा करणारी किंवा आपल्या वाणीमुळे इतरांची मने दुखतील असे भयंकर बोलणारी माणसे खऱ्याअर्थाने दरिद्री असतात. आपल्याला प्राप्त झालेल्या वाणीवैभवातून इतरांची मने जिंकता आली पाहिजेत. प्राप्त ज्ञान आपल्याला अतिशय सुत्रबद्ध पद्ध्तीने आणि रसाळ वाणीने गरजवंतापर्यंत पोहचविता आले पाहिजे. दहा हजार माणसात एक वक्ता असतो आणि दहा हजार वक्त्यात एक वक्ता असा असतो की, जो श्रोत्यांचे पूर्ण समाधान करतो. विविध वक्त्यांचे परिश्रम, मेहनत, जिद्द, चिकाटी व अंतिम उद्देश लक्षात घेऊन अभ्यास केला तर एक मजेदार अनुभव येईल. श्रोत्यांना शब्दसामर्थ्याने मंत्रमुग्ध करणाऱ्या वक्त्याचा अंतिम उद्देश काय? हे मात्र खूप महत्वाचे.

आपल्याला या क्षेत्रात अगदी दिग्गज असणाऱ्या आणि होऊन गेलेल्या वक्त्यांचा सारांश रूपाने विचार करावयाचा आहे. महाभारताचे निर्माते व्यास यांनी महाभारत हा ग्रंथ अविरतपणे सांगितला आणि त्यासाठी गणेशानी तेवढेच तत्परतेने लेखनिकाचे कार्य केले असे सांगितले जाते. वक्तृत्वाचा उत्तम नमुना म्हणून व्यासांनी केलेल्या या कार्याचा उल्लेख केला जातो. व्यासांनी ज्या ठिकाणी बसून महाभारत सांगितले त्या जागेला व्यासपीठ म्हटले जाते. त्यामुळेच वक्तृत्वाच्या माध्यमातून जेंव्हा विचार व्यक्त केले जातात. वक्त्यांच्या त्या जागेलाही व्यासपीठ म्हणून संबोधन्याची प्रथा निर्माण झाली. ती जागा प्रज्ञावंतांची आहे. ज्ञानसूर्याची आहे, असे समजले जाते. भगवान श्रीकृष्ण भारतीय इतिहासातील उत्कृष्ठ वक्ते समजले जातात. त्यांनी साधलेला संवाद अजरामर झाला. कुरुक्षेत्रावरील विशद केलेली भगवत गीता त्यांच्या वक्तृत्वाचा उत्कृष्ट नमुनाच होता. पांडवाकडे श्रीकृष्णासारखा उत्तम वक्ता असल्यामुळे त्यांचा विजय होऊ शकला. कौरवांचा विजय का होऊ शकला नाही हे सांगण्याची आवश्यकता नाही.

बुध्दाने जगाला दुखा-पासून मुक्त होण्याचे तत्वज्ञान सांगितले. भरकटलेल्या जीवाला जीवन मार्ग सांगितला. त्यांचे असंख्य अनुयायी तयार झाले. ते आजही बुद्धाच्या वाणीवैभवाने प्रभावित होऊन कार्य करीत आहेत. बुद्ध आणि काश्यप यांचे तर गुरूशिष्याचे उत्तम उदा आहे. ज्या जंगली लोकांच्या प्रबोधनासाठी आपण जाणार आहोत ते आपल्याला शिव्या देणार असतील, मारणार असतील, आपला जीव घेणार असतील तरी मी तिथे प्रबोधनासाठी जाणारच, कारण तिथेच माझ्या ज्ञाना-ची खरी गरज आहे, या विचारावर ठाम असणाऱ्या काश्यपाची किती अढळ श्रद्धा असेल? आपल्या गुरुवर, ज्ञानावर आणि वक्तृत्वावर. त्यामुळेच बुद्धासारखे गुरू व काश्यपासारखे शिष्य निर्भीड वक्तृत्वाचे धनी होऊन ते इतिहासात अजरामर झाले. आपल्या वक्तृत्वाला सत्य प्रतिपादनाची जोड दिली. ग्रीक तत्त्ववेत्ता सॉक्रेटिस तर कधीही लेखन न करता मानव समूहाशी अहर्निश संवाद साधनारा महान तत्त्ववेत्ता. त्याचे सत्य व स्पष्ट विचार तत्कालीन धर्म व राज्यव्यवस्थेला मान्य झाले नाही. त्याला शिक्षा म्हणून विषप्राशन किंवा माफी मागण्याचा पर्याय ठेवण्यात आला, तेंव्हा सत्याची कास व ध्यास धरणाऱ्या या महान वक्त्याने विषप्राशनाचा पर्याय निवडला. आपल्या विचारावर व शब्दावर ठाम राहून सत्याचा शोध घेणारा सॉक्रेटिस त्यामुळे विश्वात अजरामर झाला.

इ. स. पूर्व ४६६ मध्ये सिसलीतील सिराक्यूझ या ग्रीक वसाहतीत लोकशाही शासनप्रणाली अस्तित्वात आली. हद्दपार केलेल्या लोकांनी अत्याचार केलेल्या लोकांवर खटले भरले, तेंव्हा त्यांची बाजू मांडण्यासाठी त्यांना उत्कृष्ठ वक्ता, वकील हवा होता, तेंव्हा सिसिलियन ग्रीक कोरॅकने ती जबाबदारी स्वीकारली. त्याने वक्तृत्व कलेसाठी एक सुत्रबद्ध पद्धती तयार केली. व्याख्यान करताना प्रास्ताविक, सुसंगत कथन, महत्वपूर्ण टीका, मुद्देसूद सारांश, संक्षिप्त आढावा अशी व्याख्यानाची रचना असावी असे त्याचे मत होते. इ. स. पूर्व ३८४ ला प्रगटलेल्या डेमोस्थेनिसने जगाला दाखवून दिले की, वक्ता हा जन्म घेत नसतो, तर तो त्याच्या स्वयंप्रेरणेने व अतिकष्टाने तयार होत असतो. त्याचा पारंपरिक व्यवसाय तलवारी तयार करण्याचा असल्यामुळे आपले शब्द तलवारीच्या धारेप्रमाणे असावे या विचारावर तो ठाम होता, पण त्याचा आवाज बारीक व उच्चार स्पष्ट नसल्याने शब्दाला धार प्राप्त होत नव्हती. आपले उच्चारदोष लक्षात घेऊन त्याने अभूतपूर्व साधना सुरू केली. समुद्र किनाऱ्यावर जाऊन लाटांच्या गर्जना सुरू असताना मोठ्या आवाजात त्याने बोलण्याचा सराव सुरू केला. उसळत्या लाटाबरोबरच त्याला उसळत साहस प्राप्त होत होता. सदोष स्वरयंत्रामुळे होणारी दमछाक व त्याचा उच्चारदोष नाहीसा करण्यासाठी डोंगरावर धावत जाणे. शब्दोच्चार स्पष्ट येण्यासाठी तोंडात लहान गोरगोट्या ठेवून बोलण्याचा सराव त्याने सुरू केला. सरावातून सिध्दी प्राप्त झाली. वक्तृत्व घडवावे लागते. हा आदर्श डेमास्थेनिसने जगासमोर ठेवला. वक्तृत्वात जिवंतपणा येण्यासाठी मुद्राभिनय करता यावेत यासाठी नाटकातील नटाकडून ते शिकून घेतले. अथक प्रयत्न करूनही त्याचे पाहिले व्याख्यान अयशस्वी झाले, तरी त्याने आपल्या मनाला निराशेचा स्पर्श येऊ दिला नाही आणि आपल्या वक्तृत्वाला शुध्द चारित्र्याचा परिसस्पर्श दिला.

आपल्या 'रेटारीक' ग्रंथात नितीपर, करुण, रसोत्पादक व तार्किक हे तीन भाव निर्माण करणारे वक्तृत्व असावे असे ऑरिस्टाटल यांनी आपले मत मांडले. त्याच्या मते, नीतीचा आधार घेऊन करून रसाने ओतप्रोत असलेले तार्किकतेच्या कसोटीवर सादर केले जाते त्याला भाषण असे म्हणतात. त्याने जगज्जेत्या सिकंदरला वक्तृत्वकलेची शिकवण दिली, त्यामुळेच त्याच्या मनात जग जिंकण्याची ईर्षा निर्माण झाली व पराक्रमी अनुयायांची शृंखला तो निर्माण करू शकला. सिसरो रोममधला प्रसिद्ध वक्ता होता. 'द ओरेटर' नावाच्या आपल्या ग्रंथात तो म्हणतो. वक्ता हा विद्वान, व्यासंगी, भाषाप्रभू, श्रोत्यांची नाडी ओळखणारा, त्यांना जाणणारा असावा. तो जागृत, दक्ष, संवेदनशील, निरीक्षक असावा, त्यामुळे त्याचा प्रभाव निर्माण होतो, त्याचे भाषणही प्रभावी होते. त्याने अथेन्स व ऱ्होड्स येथील वक्तृत्व विद्यालयातून भाषणकलेचे शिक्षण व प्रशिक्षण घेतले. आपल्या वाणीवैभवातून त्याने श्रोत्यांच्या मनावर अधिराज्य केले. सिसरोचा वाढता प्रभाव संपविण्यासाठी शत्रूंनी त्याच्या विरुध्द कटकारस्थाने केली व एके दिवशी मारेकरी पाठवून त्याचे डोके उडविले.त्याचा विचार मात्र विरोधकांना संपविता आला नाही. भिन्न भिन्न डोक्यातून सिसरो बोलतच राहिला.

इंग्लंडसारख्या लोकशाहीच्या प्राचीन भूमीत अनेक नामवंत वक्ते होऊन गेले.अशाच वक्त्यांच्या नामावलीतील प्रतिभा संपन्न वक्ता म्हणून जगप्रसिध्द झालेला, भौतिकशास्त्रज्ञ, संशोधक तरीही मायकेल फेराडे होय. त्याच्या मते वक्त्याने आपले पूर्ण कौशल्य पणाला लावून श्रोत्यांचे मन, मेंदू आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी विचारांचे प्रगटीकरण करावे. श्रोत्यांनी शेवटच्या क्षणापर्यंत उत्सुकता वाटावी. त्यांची उत्कंठा शिगेला पोहचावी. यादृष्टीने रचना असावी. वक्ता निर्भय, मनमोकळा एकाग्रचित्त व ठामपणे विषयाचे प्रतिपादन करणारा, तसेच तो स्पष्ट विचारांचा व निसंदिग्ध ज्ञानाचा अधिकारी असावा. वक्तृत्वकलेला गौरव प्राप्त करून देण्यासाठी हे विचार प्रत्यक्षात आणले गेले पाहिजे.

एकेकाळी जर्मनीच्या सैन्यात साधा सैनिक असलेला हिटलर फक्त स्वतःच्या वक्तृत्व सामर्थ्यावर यजर्मन लोकांचा हृदयसम्राट झाला. आवेशपूर्ण भाषणाचा उत्तम नमुना त्याने आपल्या साधनेतून प्राप्त केला होता. वक्तृत्वाने स्वतःचे भविष्य बदलता येते, अनेकांची आपल्या वाणीवैभवातून कारण कर्णतृप्तीही करता येते. अनेकांचे विचार सकारात्मक दिशेने नेता येतात. मानवी संपत्ती संस्कारशील, विचारक्षम व कार्यक्षम बनविता येते, पण आपल्या विषारी वाणीने सर्वजगात दहशत निर्माण करून जगाला विनाशाच्या खाईत नेणारा हिटलर एक क्रूरकर्मा म्हणूनच जगाच्या स्मरणात राहतो. हिटलरचे वक्तृत्व जर्मनी बरोबरच जगाला विनाशाच्या खाईत नेणारे ठरले. हिटलरच्या पावलावर पाऊल ठेवून बेनिटो मुसोलिनी आपल्या वक्तृत्वाच्या बळावर इटालीचा हुकूमशहा झाला. आपला शब्द प्रमाण मानायला लोकांना बाध्य करण्याची कला त्याच्या शब्दात होती. त्याने कार्ल मार्क्स, सोरेल, लुई ग्लानकी या विचारवंतांचे साहित्य अभ्यासले. समाजवादी कामगार नेता ते इटालीचा हुकूमशाह हा त्याचा चित्तथरारक प्रवास. कार्य हिटलरसारखे आणि अंतही हिटलर सारखाच. आपल्या देशाला व पर्यायाने जगाला महायुद्धाच्या खाईत लोटून हे मानवी जीवनाचे खलपुरुष. स्वतः सुखी झाले नाही आणि मानवी जीवनही त्यांनी सुखी होऊ दिले नाही. मुसोलिनी आणि त्याची प्रेयसी क्लेरा पेतिस यांना इटालीच्या जनतेने गोळ्या घालून ठार केले व त्यांच्या प्रेताचीही अवहेलना केली.

वक्तृत्वाची आवड असणारे युवा मित्र, या सर्व वक्त्यांच्या कार्य-कर्तृत्वावरून आपल्या वाणीवैभवाचा उपयोग आपण कसा करायचा हे तुम्हीच ठरविले पाहिजे. जेंव्हा आपले वक्तृत्व आणि विचार मनुष्यरूपी राक्षसांचे गुलाम होतात तेंव्हा मानवी जीवन रसातळाला जाण्याची शक्यता मोठ्या प्रम णात असते. आपल्यातील या गुणवैभवाने मनुष्य जीवनाला समृध्द करणे हाच मनुष्यधर्म आहे याची जाणीव आपणास व्हावी हीच अपेक्षा.

**-प्रा. वसंत गिरी**
मेहकर, जि. बुलडाणा
मो. ९०११२२९२३२

# हेडफोन, कर्कश आवाजामुळे बहिरेपणाचा धोका

कानाला हेडफोन लावून गाणे ऐकणारे तरुण हे महाविद्यालयाच्या कॅम्पसमध्ये, वाहनांमध्ये हमखास दिसतात. आजकाल मोबाइलप्रमाणेच सध्या हेडफोनही तरुणांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. वाहनांम धून प्रवास करताना, गाडी चालव-ताना, जेवताना इतकेच काय तर अगदी अभ्यास करतानासुद्धा हेडफोनवर गाणी ऐकण्याचा मोह तरुणांना आवरत नाही. पण या सवयीमुळे अनेक शारीरिक, मानसिक आजार तर जडतातच, पण त्याचबरोबर यामुळे अपघातांचे प्रमाण वाढल्याचेही समोर आले आहे. याचा परिणाम अनेकदा हा छंदच जीवघेणा ठरत आहे. कानाला हेडफोन लावून रस्ता, रेल्वे लाईन ओलांडणे, वाहन चालवताना कानाला हेडफोन लावणे हे अपघाताला निमंत्रण ठरत आहे. बहिरेपणा, मानसिक आजार याचबरोबर जीवावर बेतणे यानुसारख्या गोष्टी या हेडफोनच्या वापरामुळे घडत आहेत.



हेडफोन आणि कर्कश आवाजा-तील कार्यक्रमांमुळे जगभरातील सुमारे एक अब्ज तरुणांना बहिरेपणाचा धोका असल्याचा निष्कर्ष नवीन अभ्यासात नोंदविण्यात आला आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या (डब्ल्यूएचओ) नेत्तृत्वाखालील अभ्यासातील निष्कर्ष बीएमजे ग्लोबल हेल्थ या जर्नलमध्ये प्रकाशित झाले आहेत. या अभ्यासात गेल्या २० वर्षांमध्ये इंग्रजी, स्पॅनिश, फ्रेंच आणि रशियन भाषेमध्ये झालेल्या ३३ संशोधनातील माहितीचा विचार करण्यात आला आहे.

या अभ्यासात असे आढळले की, जगभरातील २४ टक्के तरुणांम ध्ये मोबाईल फोनचे हेडफोन वापरताना त्यांच्या ऐकण्याच्या पद्धती ही र्शवणसंस्थेसाठी हानीकारण होत्या. ४८ टक्के तरुण जे मनोरंजनाच्या ठिकाणी क्षमतेपेक्षा अधिक आवाजाच्या संपर्कात आले होते. सर्व अभ्यास एकत्र केले तर जगभरात ६ लाख ७० हजार ते १.३५ अब्ज तरुणांना हेडफोन आणि गोंगाटाच्या संपर्कात आल्यामुळे श्रवणशक्ती बाबत धोका असल्याचे स्पष्ट झाले.

या अभ्यासाबाबत दक्षिण कॅरोलिना मेडिकल युनिव्हर्सिटीच्या ऑडिओलॉजिस्ट लॉरेन डिलार्ड यांनी म्हटले आहे की, हेडफोन्सवरून ऐकू येण्याचा धोका कमी करण्याचा सर्वो त्तम मार्ग म्हणजे आवाज कमी ठेवणे आणि हेडफोनचा वापर कमी करणे हा आहे, पण अलिकडे लोकांना खूप मोठ्या आवाजात संगीत आवडते. मात्र बहिरेप-णाचा त्रास होवू नयेसाठी तरुणी हेडफोन वापरतानाआवाजाचीपातळीतपासणीसाठी स्मार्टफोनवरील अँपचा वापर करावा. हेडफोनचा वापर आणि गोंगाटाच्या ठिकाणी तुम्ही सातत्याने वावरत असाल तर उत्तारवयात याचा मोठा परिणाम होवू शकतो. यावर तोडगा काढण्यासाठी सर्वच देशातील सरकारने आवाजाच्या पातळीबाबत डब्ल्यूएचओच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करावे, असे आवाहनही डिलार्ड यांनी केले आहे. डब्ल्यूएचओच्या माहितीनुसार जगातील एकूण लोकसंख्येच्या पाच टक्क्यांहून अधिक लोकांच्या श्रवणशक्तीवर परिणाम झाला आहे. जगभरात २०५० पर्यंत ही लोकसंख्या ७०० दशलक्षांपर्यंत वाढेल, असेही नमूद करण्यात आले आहे.

शालेय विद्यार्थ्यांपासून म हाविद्यालयातील तरुणांपर्यंत सर्वांना अशाप्रकारची सवय लागली आहे. कुटुंबातील कमी होत चाललेला संवाद आणि त्यामुळे मुलांमध्ये वाढलेला एकाकीपणा या सतत कानाला हेडफोन लावण्याच्या सवयीला कारणीभूत गोष्टी आहेत, असे म्हणायला हवे. भावनांना वाट करून देण्यासाठीचे माध्यम म्हणून मुले याकडे सहज वळतात, असे काही मानसोपचार तज्ज्ञांनी मत व्यक्त केले आहे. प्रत्यक्ष भेटून बोलण्यापेक्षा मोबाइलवर बोलणे सुरू झाल्याने अनेकदा मोबाइलवर तासभरही संवाद चालतो. त्यात एकावेळी अनेक कामे करण्याच्या सोयीमुळे हे हेडफोन गरजेचे बनले आहेत. दररोज दोन दोन तासाहून अधिक हेडफोनचा वापर करणे शारीरिक आणि म ानसिक आजाराला निमंत्रण असल्याचेही मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. कमी ऐकू येणे, दुसऱ्याने उच्चारलेला शब्द व्यवस्थित ऐकू न येणे, अशा तक्रारी असणाऱ्या रुग्णांची संख्या वाढत आहे. तासंतास फोनवर बोलल्यामुळे किंवा जास्त काळ डीजेच्या आवाजाच्या संपर्कात राहिल्यामुळे कानांच्या पेशींची कार्यक्षमता कमी झाल्यास कायमचा बहिरेपणा येऊ शकतो,असे डॉक्टर मंडळी सांगताना दिसतात. याचा मानसिक इफेक्टही मोठा धोकादायक आहे.

हेडफोनचा वापर हा आता सवयीचा भाग बनल्याचे तरुण सांगत असले तरी पण हेडफोनवर गाणे ऐकताना जीवनातील परिस्थितीशी समान असे गाणे ऐकून भावना व्यक्त करण्याचा प्रयत्न केला जातो. पण या स्वप्नाच्या विश्वातून बाहेर येऊन वास्तविकतेचे भान ठेवणे गरजेचे आहे. गाडी चालवताना किंवा रस्त्यावरून चालताना मोबाइल आणि हेडफोनद्वारे गाणे ऐकत असल्याने सभोवतालच्या जगाचा विसर पडतो. त्यामुळे ही सवय अपघातास कारणीभूत ठरते. म्हणून किमान गाडी चालवताना किंवा रस्त्यावर चालताना तरी याचा वापर टाळणे आवश्यक आहे. हेडफोन हे अपघातांबरोबरच पिढीला भावनिक शून्यतेकडे नेण्याचे काम करतात. त्यामुळे हेडफोनचा वापर कमी प्रमाणात केला गेला पाहिजे.

**-मच्छिंद्र ऐनापुरे,**
जत जि. सांगली

# विवाह सोहळा; खर्च टाळा!



विवाह एक धार्मिक संबंध असून, प्राचीन युनान, रोम, भारत इत्यादी सर्व सुसंस्कृत देशात विवाहाला धार्मिक बंधन तसेच कर्तव्य समजले जाते. वैदिक युगात यज्ञ करणे प्रत्येक व्यक्तीसाठी अनिवार्य होते, परंतु यज्ञ पत्नीशिवाय पूर्ण होत नाही, असे समजले जात होते, म्हणून विवाह सगळ्यांना धार्मिक दृष्टीने आवश्यक होता. तुळशी विवाह हा हिंदू संस्कृतीत विशेष महत्त्वाचा धार्मिक विधी आहे, ज्याच्या पश्चात लग्नसराईला सुरुवात होते. परंतु सध्याच्या काळात विवाह समारंभांचा उद्देश केवळ दोन व्यक्तींना विवाहबंधनात जोडणे नसून तो एक मोठा उत्सव किंवा दिखाऊ सोहळा बनला आहे. या दिखाऊपणामुळे समाजात प्रचंड खर्च करण्याची प्रवृत्ती वाढीस लागली आहे, ज्याचा मोठा फटका मध्यमवर्गीय आणि निम्नवर्गीय कुटुंबांना बसतो.

खोटच्या प्रतिष्ठेच्या मागे अनावश्यक खर्च-सध्याचा ट्रेंड पाहता नवश्रीमंत आणि प्रतिष्ठेच्या मागे असलेले लोक विवाह समारंभात अत्याधिक खर्च करताना दिसतात. महागड्या कपड्यांचे संग्रह, आलिशान वाहने, सजावट आणि इतर विविध प्रकारच्या दिखाऊ कार्यक्रमांमुळे लग्न समारंभ आर्थिकदृष्ट्या भारदस्त होतो. या प्रकारचे अनावश्यक खर्च कर्जबाजारीपणास कारणीभूत ठरू शकतात. समाजात प्रतिष्ठा आणि प्रसिद्धी मिळवण्यासाठी या खर्चांचे दडपण कुटुंबांवर पडते.

साधेपणाचा स्वीकार-वास्तविक, साध्या पद्धतीनेही विवाह सोहळा आकर्षक आणि संस्मरणीय करता येऊ शकतो. महागड्या दागिन्यांचा भार, फटाक्यांचा अनावश्यक वापर, महागडी सजावट आणि पाहुण्यांचा अतिरेक टाळल्यास लग्न समारंभ साधेपणाने साजरा करता येतो. साधेपणा आणि पारंपरिकतेला प्राधान्य दिल्यास फालतू खर्च टाळणे शक्य होते आणि त्याचवेळी समारंभाची आनंदमयी अनुभूती देखील मिळू शकते.

सामाजिक दृष्टिकोन-विवाह समारंभ हा आनंदाचा क्षण असतो. परंतु त्यासोबत आलेला अनावश्यक खर्च आणि त्यातून निम र्ण होणारा ताण टाळणे अत्यंत आवश्यक आहे. समाजात अशा विवाह समारंभांना प्रोत्साहन दिल्यास, साधेपणाचा स्वीकार वाढेल आणि आर्थिक दृष्टिकोनाने कुटुंबे मजबूत राहतील. यामुळे सामाजिक सलोखा आणि आर्थिक शाश्वतता टिकवून ठेवता येईल. यानिमित्ताने, साध्या पद्धतीने विवाह साजरा करणे ही काळाची गरज आहे.

समारंभातील दिखावूपणाला फाटा देऊन साधेपणाला आणि वास्तविकतेला महत्व दिल्यास, विवाह सोहळा अधिक सुंदर आणि अर्थपूर्ण ठरेल. त्यामुळेच, आपली प्रतिष्ठा आणि आनंद साधेपणातही अबाधित राहू शकतो.

**-प्रा. व्ही. व्ही. कोष्टी**
शिपूर, जि. सांगली

# राज्यात अनेक ठिकाणी ईव्हीएम मशीन बंद, मतदारांचा खोळंबा



**मुंबई :** राज्यात विधानसभा निवडणुकीसाठी मतदान पार पडत आहे. सकाळी सात वाजल्यापासून मतदानाला सुरूवात झाली आहे. राज्यात संपूर्ण मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडावी, यासाठी निवडणूक आयोग आणि पोलीस यंत्रणा सज्ज झाली आहे. मात्र, त्यातच अनेक मतदान केंद्रावरील ईव्हीएम मशीन बंद पडल्याच्या घटना समोर आल्या आहेत. त्यामुळे मतदारांचा खोळंबा झाला आहे.

अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघातील बी. आर् हायस्कूलमधील बूथ क्रमांक १६९ मधील ईव्हीएम मशीन बंद पडले आहे. सकाळी मतदान सुरू झाल्यापासूनच मतदान यंत्रात बिघाड झाला आहे. या मतदान केंद्रावरील मतदान बराच काळ सुरू झाले नाही. मतदान केंद्रावर मतदार ताटकळत उभे राहिल्याचे चित्र पाहायला मिळाले.

मालेगाव बाह्य विधानसभा मतदारसंघात बूथ क्रमांक २९२ या ठिकाणी असलेले ईव्हीएम मशीन बंद पडले आहे. या बूथवर असलेले ईव्हीएम मशीन हे इनव्हॅलिड दाखवत असल्याचे पाहायला मिळत आहे. यामुळे मालेगावातील अनेक मतदार हे ताटकळत असल्याचे दिसत आहेत. मालेगाव बाह्य विधानसभा मतदारसंघात अनेक नागरिक हे सकाळपासूनच मतदान केंद्रावर मतदानासाठी रांगा लावून उभे आहेत. मात्र ईव्हीएम मशीन बंद असल्याने नागरिकांचा खोळंबा होत आहे.

## थोडक्यात...

### कुंडलवाडीत ६३ टक्के मतदान

**कुंडलवाडी–** कुंडलवाडी परिसरात ६३ टके मतदान झाले आहे. शहरातील एकुण १२ हजार १०९ मतदारांपैकी ७ हजार ६४६ मतदारांनी मतदान केले असल्याची माहिती झोनल अधिकारी पी. पी. कोरके यांनी दिली असुन या पैकी पुरुष ३९४९ तर महिला ३६९७ मतदारांनी आपला मतदांनाचा हकक बजावला आहे.

मतदानाची प्रकिया शांतेत पार पाडण्यासाठी सहायक पोलीस निरिक्षक भागवत नागरगोजे व पीसआय नारायण शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय डेरे व सेंट्रल रिर्जव्ह फोर्सचे एकुण १६ जवानांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

### रेल्वेस्टेशन परिसरात मोबाईल चोरीला

**नांदेड–** शहराच्या रेल्वेस्टेशन समोर असलेल्या ऑटो पॉईंटवर एका शिक्षिकेचा मोबाईल अज्ञात चोरट्याने चोरून नेला. ही घटना १९ नोव्हेंबर रोजी सकाळी आठच्या सुमारास घडली. वजिराबाद पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हुजूर साहेब रेल्वे स्थानकासमोर ऑटो पॉईंट आहे. विष्णुपुरी येथील सहयोग कॅम्पस परिसरात राहणाऱ्या शिक्षिका कल्पना विठ्ठलराव भुसेवाड (वय ३८) ह्या आपल्या निवडणूक अनुषंगाने कर्तव्य बजावण्यासाठी किनवट येथे जाण्यासाठी विष्णुपुरी येथून त्या ऑटोने रेल्वे स्थानकात आल्या. ऑटोतून उतरल्यानंतर गर्दीचा फायदा घेऊन चोरट्याने त्यांच्या पर्समधील आयफोन १५ ब्ल्यू हा पन्नास हजार रुपये किंमतीचा मोबाईल चोरट्याने लंपास केला. या प्रकरणी विनायक अरदडे यांच्या फिर्यादीवरून वजिराबाद ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार नागरगोजे करत आहेत.

# मुदखेडमधील मतदान केंद्रांवर वेळ संपल्यानंतरही रांगा



**मुदखेड–** नांदेड लोकसभा पोटनिवडणूक आणि भोकर विधानसभा निवडणूक मतदान प्रक्रिया मुखेड तालुक्यात शांततेच्या वातावरणामध्ये पार पडली. भोकर विधानसभा मतदारसंघामध्ये मुदखेड तालुक्यात २० नोव्हेंबर रोजी बुधवारी सकाळपासून मतदारांनी मतदान करण्यासाठी मतदान केंद्रावर गर्दी केली होती.

तालुक्यातील पार्डी येथे एकच मतदान केंद्र असल्यामुळे या ठिकाणी रात्रीच्या आठ वाजेपर्यंत मतदारांच्या रांगा लागल्या होत्या. या ठिकाणी सर्वात जास्त मतदान झाले मुदखेड शहरांमध्ये मतदान केंद्र २८५ व २३६ या मतदान केंद्रावर मतदानाची वेळ संपल्यावरही रांगा लागल्या होत्या. बहुतांश गावात एकच मतदान केंद्र असल्यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे महिलांची मोठ्या प्रमाणात गर्दी दिसून आली.

प्रशासनाने ज्या ठिकाणी एकच मतदान केंद्र आहे त्या ठिकाणी दोन मतदान केंद्र उभारावे अशी मागणी मतदारांनी केली होती. तालुक्यामध्ये कुठेही अनुचित प्रकार घडला नसून शांततेत मतदान पार पडले. पोलीस बंदोबस्तामध्ये निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पडली.

## बरबडा येथील केंद्रावर मतदारांची गर्दी



**बरबडा –** नायगाव तालुक्यातील बरबडा येथे लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभेच्या निवडणूकीसाठी सकाळपासूनच मतदानाला प्रारंभ झाला. एकूण सहा बुथच्या माध्यमातून ७५.४० % मतदान झाले.

बुथ नंबर ९७ मध्ये ८७० पैकी ६६९, बुथ ९८मध्ये १००७ पैकी ७२६, बुथ ९९ मध्ये १०८४ पैकी ७९१, बुथ १०० मध्ये ९५८ पैकी ७२३ बुथ १०१ मध्ये ९५९ पैकी ७५१ आणि बुथ १०२ मध्ये १००४ पैकी ७६५ झाले आहे. त्यामध्ये एकूण ५८७१ होते. त्यापैकी ४४२५ मतदारांनी हक्क बजावला आहे. त्यापैकी पुरुष २२६८ तर स्त्री २१५७ इतके होते. एकूण ७५.४० % मतदान झाले आहे.

यामध्ये बि.एल.ओ.म्हणून दिलिप जेटेवाड, साहेब सुरेवाड, साहेब गुंटे, गोविंद मार्गेपवार, दत्ता अंबुलगे, शिवाजी शेवाळे यांनी कर्तव्य बजावले.

या अटीतटीच्या निवडणुकीत कोणाच्या गळ्यात विजयाची माळ पडेल हा आता चौका चौका मध्ये उत्सुकतेचा विषय बनला आहे. कोण निवडून येईल याचा अंदाज बांधणे सुद्धा अवघड आहे, असे बोलल्या जात आहे.

या मतदानामध्ये मोठया प्रमाणात क्रॉसिंग मतदान झाल्याची चर्चा होत आहे. 'वंचित'च्या जोरदार मुसंडीने कोणाला झटका बसेल, हे सांगता जरी आले नसले तरी 'वंचित'ची चर्चा जोरदार होत आहे. दोन्हीही तगड्या उमेदवारांमध्ये 'वंचित'ची प्रचार यंत्रणा कमी पडली असली तरी काँग्रेसला धोकादायक ठरू शकते व भाजपाला फायदा होऊ शकते असे बोलले जात आहे.

कुंटूर पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक सोनुले यांच्या मार्गदर्शनाखाली मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. त्यांच्या सोबत पोलीस कॉन्स्टेबल आणि पोलीस पाटील कानगुले तसेच शिपाई खंडू मुंडफळे आदी कर्मचाऱ्यांनी बंदोबस्त ठेवून निवडणूक शांततेत पार पाडण्यासाठी मदत केली आहे.

## जुन्या वादातून तिघांना जबर मारहाण; हिमायतनगरमध्ये सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल




**नांदेड –** हिमायतनगर तालुक्यातील सहा जणांनी जुन्या वादातून तिघांना जबर मारहाण केली. ही घटना १७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सातच्या सुमारास आंदेगाव येथे घडली.

आंदेगाव येथील आरोपी मिलिंद वाढवे यांनी आपले अन्य सहकारी राजू वाढवे, महेंद्र वाढवे, शुभांगी वाढवे आणि तृप्ती वाढवे तसेच धम्मपाल वाढवे यांना सोबत घेऊन जुन्या भांडणाचा वचपा काढण्यासाठी दिव्यांग असलेला अंकुश खिलारे, सतीश खिल्लारे आणि त्यांची आजारी आई निर्मलाबाई खिल्लारे यांना रस्त्यात अडवून लोखंडी रॉड, दगड व काठीने जबर मारहाण केली. विशेष म्हणजे दिव्यांग असलेला अंकुश आणि त्याचा भाऊ सतीश हे दोघेजण त्यांच्या आईला दवाखान्यात नेत असताना हा प्रकार घडला.

निर्मलाबाई खिल्लारे यांच्या फिर्यादीवरून वरील सहा जणांविरुद्ध गंभीर दुखापत व अपंग व्यक्ती अधिनियम २०१६ कायद्यानुसार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक नामदेव मद्दे करत आहेत.

**रामतीर्थ पोलीस ठाण्यात अटकळी येथेही जबर मारहाणीची घटना**

बिलोली तालुक्यातील अटकळी येथे १८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी सात ते आठच्या दरम्यान शंकर सुरेश कोंडामंगल याने एकाला आमच्या समाजाच्या मुलीसोबत लग्न का केले म्हणून जबर मारहाण केली. तसेच डोके फोडून जीवे मारण्याचा प्रयत्न केला. किरण माधवराव कुलकर्णी यांच्या फिर्यादीवरून रामतीर्थ पोलीस ठाण्यात शंकर कोंडामंगलविरुद्ध गंभीर दुखापत केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार जांभळीकर करत आहेत.

## विष्णुपूरी येथील पर्यावरणपूरक मतदान केंद्राने वेधले लक्ष

**नवीन नांदेड–** निवडणूक आयोगाने यंदा इकोफ्रेंडली मतदार ग्रीन मतदार बुथ उभारणीसाठी सूचना दिली आहे. याच सूचनेच्या अनुपालनासाठी जिल्हा ग्रामीण स्विप कक्षाच्या प्रमुख तथा जि.प.नांदेडच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल यांच्या अभिनव संकल्पनेतून विष्णुपुरी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत पर्यावरणपूरक मतदाने केंद्र उभारण्यात आले होते.



निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सचिन खल्लाळ, शिक्षणाधिकारी प्राथमिक, डॉ. सविता बिरगे, माध्यमिक शिक्षणाधिकारी, माधव सलगर, उपशिक्षणाधिकारी रामचंद्र पाचंगे, दिलीप बनसोडे यांच्या मार्गदर्शनाखाली जि.प.हा.विष्णुपूरी प्रशालेने इकोफ्रेंडली मतदान बुथ तयार करण्यात आले होते.

नायब तहसीलदार नितेशकुमार बोलेलू, मकरंद भालेराव–महसूल सहाय्यक, स्वीप कक्ष सक्रिय सदस्य नांदेड दक्षिण राजेश कुलकर्णी व संजय भालके यांनी भेट दिली. संपूर्ण मतदान परिसर नैसर्गिक झावळ्यांनी, विविध रोपांनी, प्लास्टिक मुक्तपणे तयार केला आहे. पाणी पिण्यासाठी मातीच्या भांड्यांची, मडक्याचा वापर केला आहे. ग्रीन मॅट प्रवेशद्वारापासून अंथरली असून विविध फुलझाडांच्या कुंड्यांनी लावण्यात आल्या होत्या. केळीची पान, पारंब्या, हिरव्या नारळाच्या झावळ्या उपयोगात आणल्यामुळे परिसर थंडगार व रमणीय आकर्षक झाला होता. मतदार म्हणून विलास देशमुख हंबर्डे यांनी मतदान प्रक्रियेत उत्साहाने भाग घेतला. या उपक्रमासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका उज्ज्वला जाधव, एम. ए. खदीर, मिरा रेवणवार, पद्माकर देशमुख, कावळे गुरुजी यांनी परिश्रम घेतले.

## माहूरच्या ग्रामीण रुग्णालयात अद्ययावत डायलिसिस केंद्र कार्यान्वित

**माहूर–** किडनी निकामी झालेल्या रुग्णांसाठी अत्यावश्यक होमोडायलिसिस यंत्राची दीर्घकाळ प्रलंबित असलेली मागणी यंदा पूर्ण झाली आहे. शहरातील ग्रामीण रुग्णालयात अखेर महा डायलिसिस केंदाची स्थापना करण्यात आली असुन आजपासून रुग्णांना या मोफत सेवेचा लाभ घेता येणार आहे. पाच बेडचे डायलिसिस केंद्र ग्रामीण रुग्णालयाच्या नवीन इमारतीत सुरु करण्यात आले आहे. महत्वाचे म्हणजे पहिल्याच दिवसापासून या केंद्राला रुग्णांचा प्रतिसाद पाहायला मिळत आहे.



या सेंटरमध्ये अत्याधुनिक डायलेसिस मशीन, प्रशिक्षित डॉक्टर आणि नर्सेसची टीम उपलब्ध असणार आहे. केंद्राचे उद्दिष्ट किडनी रोगग्रस्त रुग्णांसाठी उच्च दर्जाची आणि वेळेवर उपचार सेवा प्रदान करणे आहे. यामुळे रुग्णांना स्थानिक स्तरावरच उच्च प्रतीचे उपचार मिळू शकतील, तसेच प्रवासाचे ताण कमी होईल. सेंटरच्या स्थापनेमुळे शहरातील आरोग्यसेवेची गुणवत्ता सुधारेल, तसेच स्थानिक लोकांना अधिक सुलभ आरोग्य सेवा मिळतील, असे नागरिकांचे म्हणणे आहे. या केंद्राच्या माध्यमातून, अनेक गरीब रुग्णांना डायलेसिसचे उपचार मोफत मिळण्याची संधी मिळणार आहे.

## बाऱ्हाळी सर्कलमध्ये विक्रमी ७० टक्के मतदान

**बाऱ्हाळी–** मुखेड तालुक्यातील बाऱ्हाळी येथे सकाळी ७ ते सायंकाळी ६ वाजताच्या दरम्यान शांततेत मतदान पार पडले. दिवसभरात झालेल्या मतदानाला मतदारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. येथील मतदानाचे ७० टक्के प्रमाण आहे.

मुखेड कंधार विधानसभा व लोकसभेची सार्वत्रिक पोटनिवडणूक प्रक्रियेचे मतदान जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व विद्या विकास विद्यालयात घेण्यात आले.

बाऱ्हाळीत एकुण मतदार संख्या ५५९३ इतकी असून यापैकी ३९०४ इतके मतदान झाले. यापैकी पुरुष मतदार २०८३ तर महिला मतदार १८२१ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. एकुण मतदानाची टक्केवारी हि ६९.७०% इतकी झाली आहे. ही मतदान प्रक्रिया सहा बूथवर रात्री ८ वाजेपर्यंत पार पडली.

मतदान केंद्रावर मतदारांच्या रांगा दिसून आल्या. मुखेड कंधार विधानसभा व लोकसभेची सार्वत्रिक पोटनिवडणूक प्रक्रिया दरम्यान कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस प्रशासनाकडून चोख बंदोबस्त लावण्यात आला होता. या लोकशाहीच्या उत्साहात मतदारांमध्ये मोठा उत्साह दिसून आला.



**नांदेड :** तृतीयपंथीयांनी आंबेडकनगर येथील महानगरपालिका शाळेच्या मतदान केंद्रावर आपला मतदानाचा हक्क बजावला. (छाया : करणसिंह बैस)

## पोलीस कारवाईमध्ये १२ हजारांची दारू जप्त; तिघांना अटक

**नांदेड–** निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी मांडवी, धर्माबाद आणि किनवट येथे अवैध दारू विक्री करणाऱ्या तिघांना अटक करून त्यांच्याकडून १२ हजार रुपयांची दारू जप्त केली आहे.

लिंगी ते उनकेश्वर रस्त्यावर विष्णू यादव कनाके (वय २३) याला पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याच्याकडून सात हजार रुपयांची देशी दारू जप्त केली. हवालदार मनीष ठाकरे यांच्या फिर्यादीवरून त्याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार अस्वले करत आहेत.

दुसऱ्या कारवाईत धर्माबाद पोलिसांनी बासर रोड एसटी पॉईंट येथे कारवाई करून तुषार शंकर पर्वते (वय २४ रा. शिवनी खुर्द ता.लातूर, हल्ली मुक्काम फुलेनगर नांदेड) याच्या ताब्यात असलेली फॉर्च्यूनर गाडीची तपासणी केली. त्यात ३ हजार २०० रुपयांची विदेशी दारू आढळली. पोलिसांनी दारूसह सदरची कार जप्त केली आहे. अंमलदार शेख खदीर यांच्या फिर्यादीवरून कारचालक तुषार पर्वते विरुद्ध धर्माबाद पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार संगेवार करत आहेत.

तिसऱ्या घटनेत किनवट येथील मच्छी मार्केट परिसरात आकाश गणेश जाधव (वय १९ राहणार लिंगी ता. किनवट) याच्याकडून पोलिसांनी सतराशे पन्नास रुपयांची देशी दारू जप्त केली. अंमलदार विजय आडे यांच्या फिर्यादीवरून आकाश जाधव विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पोलीस हवालदार वाडगुरे करत आहेत.



**नांदेड :** तालुक्यातील खुरगाव येथील १०६ वर्षीय महिला रेणूकाबाई सटवाजी नरवाडे यांनी सहपरिवार मतदानाचा हक्क बजावला.

## मुखेड येथे श्री वीरभद्र स्वामी यात्रेनिमित्त अग्निकुंड व पालखी सोहळ्याचे आयोजन

**नांदेड–** मुखेडचे ग्रामदैवत श्री वीरभद्र स्वामी यात्रेस प्रारंभ झाला असून दि. २१ रोजी पहाटे ४ वाजता अग्निकुंड होणार आहे. या वर्षी निवडणुकीची आचारसंहिता असल्यामुळे कुस्त्या रद्द करण्यात आल्याची माहिती नगर पालिका प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

दि.२१ रोजी पहाटे अग्नीकुंड व पालखी मिरवणूक कार्यक्रम संपन्न होणार आहे. प्रकाश पाटील बेळीकर यांच्याकडून कर्नाटकातील पूर्वतांचा कार्यक्रम व अतुल देबडवार यांच्यावतीने फटाक्यांची आतिषबाजी, शिवराज मुगावे यांच्यावतीने विद्युत रोषणाई, यादव गव्हाणे यांच्या वतीने दीप सजावट करण्यात येणार आहे. मंदिरात वीरशैव महिला व पुरुष भजनी मंडळ यांचा दुपारी २ ते ५ या वेळेत भजनाचा कार्यक्रम राहणार आहे.

रात्री ज्ञानेश्वर भजनी मंडळ बारवगल्ली मुखेड यांचा कार्यक्रम होणार आहे. दि.२० बुधवार सायंकाळी ५ ते रात्री १२ वाजेपर्यंत स्थानिक कलाकार वीरभद्र मठपती, उत्तमराव वन्नाळे, गोविंदराव कोत्तापल्ले, दीपक कोतापल्ले, सरिता पुरी, उमाताई कोत्तापल्ले, सुमती भालके, वसंत पाटील, दत्तात्रय निम्मलवाड, रामदास बत्तेवाड, जयपाल मठपती, पांडुरंग बेळीकर, शेलार रोडगे, वादक संजय उमाटे, सुरेंद्र भद्रे, रविंद्र भद्रे, शिवराज उमाटे, अनुप वन्नाळे, विष्णुदास उमाटे, हरिदास उमाटे, ऋषिकेश इंगोले, बासरी वादक व्यंकटराव हंगरगे, निवेदक शंकरराव मुंडे, प्राचार्य रामकृष्ण बदने, बालाजी इंगोले यांच्या भक्ती गितांचा कार्यक्रम झाला आहे.

## धम्मपरिषदेच्या तयारीसाठी आज महाविहार दाभड येथे बैठक

**नांदेड–** भारतीय बौद्ध ज्ञानालंकार शिक्षण संस्था, मुळावा, शाखा महाविहार, बावरीनगर, दाभड, नांदेड वासियांच्या संयुक्त विद्यमाने महाविहार, बावरीनगर, दाभड येथे दरवर्षीप्रमाणे यंदाही पौष पौर्णिमेस १३ व १४ जानेवारी २०२५ रोजी अखिल भारतीय ३८ वी बौद्ध धम्म परिषद आयोजित करण्यात आली आहे. या धम्म परिषदेच्या पूर्व तयारीसाठी गुरुवार दि. २१ नोव्हेंबर रोजी दुपारी बावरीनगर, दाभड, नांदेड येथे पू. भिक्खू शीलरत्न स्थवीर यांचे अध्यक्षतेखाली महत्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे.

भारतीय बौद्ध ज्ञानालंकार शिक्षण संस्थेच्या वतीने २१ नोव्हेंबर रोजी दुपारी १२.३० वाजता महाविहार, बावरीनगर, दाभड, नांदेड येथे भिक्खू शीलरत्न यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीला संस्थेचे संस्थापक अध्यक्ष पूज्य भदंते धम्मसेवक महाथेरो, भदंत डॉ. उपगुप्त महाथेरो, भिक्खू डॉ. खेमधम्मो महाथेरो, भिक्खू डॉ. एम. सत्यपाल महाथेरो, भिक्खू दयानंदजी महाथेरो, भिक्खू पय्यारत्न थेरो, भिक्खू अश्वजीत थेरो व भन्ते बुद्धभूषण यांच्यासह पूजनीय भिक्खू संघाची उपस्थिती लाभणार आहे.

या महत्वपूर्ण बैठकीत बहुसंख्येने सहभागी होवून सर्वोतोपरी सहकार्य करावे, असे आवाहन अखिल भारतीय ३८ व्या धम्मपरिषदेचे मुख्य संयोजक तथा महाउपासक डॉ. एस.पी. गायकवाड व डॉ. मिलिंद भालेराव यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

CMYK

निरोगी आरोग्याचा कानमंत्र

# निरामय

# सकाळच्या 'या' सवयी ठेवतील तुम्हाला तंदुरुस्त



**थंडगार वातावरणात आपण उबदार कपडे घालून गरम पदार्थांचा आस्वाद घेण्यात आणि पहाटे अधिक वेळ पांघरुणात गुरफटून राहण्याचा विचार करीत असतो. या वातावरणामध्ये आपले शरीर सुस्तावते आणिअशा सुस्तीने आपली दिवसभराची कामे रेंगाळत पडून राहतात. त्यामुळे कधी कधी थंडीतील हे लहान होत जाणारे दिवस अधिकच लहान जाणवू लागतात. अशा आळशी आणि शिथिल हवेमुळे आपण फारशी काही हालचाल करीत नाही आणि व्यायामाकडेही दुर्लक्ष केले जाते. परंतु, आरोग्याकडे असा कानाडोळा केल्यानेच थंडीत बऱ्याचशा समस्या उद्भवतात. खासकरून हृदयासंबंधित आजार अधिक जास्त डोके वर काढतात.**

हिवाळ्यामध्ये आपल्या आरोग्याकडे लक्ष देणे फार गरजेचे असते. कारण अशा थंड हवेमध्ये हृदय आणि रक्तवाहिन्यांशी संबंधित समस्या बळावू शकतात. थंडीमध्ये शरीराला पाण्याची आवश्यकता नाही, असे समजून बरीच मंडळी पाण्याचे सेवन कमी करतात. परिणामी डिहायड्रेशनचा त्रास होतो. हृदयासाठी, हृदयाचे कार्य सुरळीतपणे चालू राहण्यासाठी शरीर हायड्रेट असणे प्रचंड गरजेचे असते. त्यामुळे आहारात फळे, भाज्या, प्रोटीनयुक्त पदार्थ, डाळी यांसारख्या पौष्टिक गोष्टींचा समावेश करून, तेलकट, अधिक कॅलरीज असणारे पदार्थ, साखरेचे पदार्थ, सोडियमचे प्रमाण अधिक असणारे पदार्थ खाणे शक्य तितके टाळावे. सोबतच हलका व्यायाम करावा. त्यामुळे वजन नियंत्रणात राहते. पुरेशी झोप घेणेही तितकेच महत्त्वाचे असते. थंडीमध्ये आरोग्याच्या कुरबुरींपासून दूर राहायचे असल्यास सकाळी काही कृतीयुक्त सवयी लावून घेणे उपयुक्त ठरू शकते. डॉक्टरांनी हिवाळ्यात आरोग्याच्या दृष्टीने फायदेशीर ठरणाऱ्या पाच सवयी सांगितल्या आहेत. त्या कोणत्या ते पाहू...

## हिवाळ्यातील आरोग्यदायी पाच सवयी

- शरीरातील पाण्याची पातळी : हिवाळ्यात हवा गार असते, त्यामुळे सतत पाणी पिण्याची गरज नाही असा विचार अनेकांच्या मनात येतो. परंतु आपल्या शरीरातील पाण्याची पातळी योग्य ठेवण्यासाठी थंडीतही पुरेसे पाणी पिणे गरजेचे असते. त्यामुळे सकाळी झोपेतून उठल्यानंतर ग्लासभर पाणी प्यावे. कारण रात्रभराच्या झोपेनंतर तुमचे शरीर थोडे डिहायड्रेट झालेले असते. त्यामुळे सकाळी उठल्या उठल्या पाणी प्यायल्याने शरीर हायड्रेट होऊन, रक्तप्रवाह सुधारतो. चयापचय क्रिया सुधारण्यास मदत होते आणि हृदयाचे कार्यदेखील सुरळीत होण्यास मदत मिळते.
- व्यायाम : या हवामानात पांघरुणामधून बाहेर पडूच नये, असे वाटत असते. परंतु, या मोहमयी विचारांवर मात करून, हलका व्यायाम करणे गरजेचे आहे. त्यासाठी तुम्ही सोपे कवायतीचे प्रकार, चालणे, योगा यांसारखे व्यायाम करू शकता.
- सकाळचा नाश्ता : सकाळचा नाश्ता हा



आरोग्याच्या दृष्टीने खूप महत्त्वाचा असतो. त्यामुळे सकाळचा आहार शक्य तितका पौष्टिक आणि पोटभरीचा असावा. त्यासाठी फळे, डाळी, ओट्स यांसारख्या पदार्थांचा आहारामध्ये समावेश करावा.
- ड जीवनसत्त्व : घरात सूर्यप्रकाश येत असल्यास सकाळी थोड्या वेळासाठी बाल्कनीमध्ये बसून कोवळे ऊन अंगावर घ्यावे किंवा सकाळी बाहेर चालायला गेल्यास तुम्हाला सूर्यकिरणांमधूनही भरपूर प्रमाणात ड जीवनसत्त्व मिळेल. हे ड जीवनसत्त्व आपल्या शरीरासाठी आवश्यक असून, हृदयासाठीदेखील महत्त्विचे असते.
- तणाव : ताणतणावामुळेदेखील आपल्या आरोग्यावर, हृदयावर परिणाम होत असतो. त्यामुळे ध्यान, योगा आणि श्वासाचे व्यायाम करून मनावरील ताण कमी करण्यास मदत होते. सकाळी शारीरिक व्यायामानंतर काही मिनिटांसाठी मनावरील ताण कमी करणारेही व्यायाम करावेत.

# हिवाळ्यात शरीराची काळजी कशी घ्याल?



**हिवाळ्यात भूक जास्त लागत असल्यामुळे आपल्या आहारामध्ये लक्षणीय वाढ होते. पचनाची क्रिया हिवाळ्यात वेगाने होत असल्यामुळे भूक लागण्याचे प्रमाण वाढते. शरीरासाठी ही गोष्ट पोषक असली तरी, व्यायामाअभावी या काळात तुमचे वजन वाढण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे थंडीत सकाळी उठून व्यायाम करण्याचा कंटाळा टाळला पाहिजे. अशावेळी तुम्हाला अगदी जिममध्ये जाण्याचा कंटाळा येत असेल, तर निदान घरच्या घरी व्यायाम नक्कीच केला पाहिजे.**

- अतिरिक्त उर्जेची गरज : व्यायाम करण्याचा मुख्य फायदा म्हणजे उर्जेचे प्रमाण वाढून शरीर तंदुरुस्त रहायला मदत होते. याशिवाय, वेगवेगळ्या आजारांपासून संरक्षण करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणारी शरीराची प्रतिकारशक्तीही व्यायामाने वाढते. एकूणच शरीरात उर्जेचा योग्य संचार असला आणि कोणतीही व्याधी नसेल तर मन आनंदी राहण्यास मदत होते.
- वॉर्मअप : कोणताही व्यायाम करताना वॉर्मअप करणे अत्यंत आवश्यक आहे. व्यायामापूर्वी वॉर्मअप केल्याने शरीरातील आखडलेल्या पेशी सामान्य अवस्थेत येण्यास मदत होते. व्यायामाची सुरुवात करताना हळूहळू सुरुवात करावी. जर तुम्हाला सलग ३० मिनिटे व्यायाम करणे शक्य नसेल तर दर १० मिनिटांनी विश्रांती घ्या.
- स्वतःला सुरक्षित ठेवा : तुम्ही दिवसभरात कोणत्याही वेळी व्यायाम करत असाल तरी त्यावेळी तुम्हाला सावध राहण्याची गरज असते. व्यायामादरम्यान कोणतीही आततायी किंवा न पेलवेल अशी कृती केल्यास तुम्हाला दुखापत होण्याची दाट शक्यता असते. त्यामुळे व्यायामाच्या ठिकाणी काही प्राथमिक गोष्टींना नक्की प्राधान्य द्या. तुम्ही जर रात्रीच्या वेळी वॉक अथवा वर्कआउट करण्यासाठी जात असाल तर, त्या भागामध्ये लाईट आहेत की नाही याची खात्री करून घ्या. व्यायाम करताना शक्यतो संगीत ऐकणे टाळावे अथवा कमी आवाजात ऐकावे. याशिवाय, गरज पडल्यास जिममध्ये वैद्यकीय उपचाराच्या प्राथमिक सोयी असतील, याची खात्री करून घ्या.




- सर्दी झाल्यास : हवामानातील बदलांनुसार सर्दी, ताप यांसारखे आजार होणे सामान्य गोष्ट आहे. सुरुवातीच्या काळात थंडी सहन न झाल्यामुळे सर्दी होण्याची शक्यता असते. सर्दी झाल्यानंतर व्यायाम करणे बंद करू नका. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार अथवा शरीराला सोसेल एवढा व्यायाम करा. मात्र, ताप आल्यास व्यायाम करणे टाळा. जर तुम्हाला, दम्याचा त्रास असेल तर, हिवाळ्यात अधिक काळजी घ्या. डॉक्टरांच्या सांगण्यानुसार व्यायामाच्या आधी इन्हेलरचा वापर अवश्य करा.
- जास्त कॅलरी बर्न होतात : हिवाळ्यात जसे भूक लागण्याचे प्रमाण वाढते, तसेच शरीरातील उर्जादेखील वेगाने खर्च होते. उन्हाळा किंवा पावसाळ्याच्या तुलनेत या काळात शरीरातील कॅलरीज वेगाने खर्च होतात. त्यामुळे व्यायामाच्या सुरूवातीला कॅलरीजचे प्रमाण वाढवण्यासाठी अधिक वेळ वॉर्मअप केल्याने फायदा होतो.

## शरीरामध्ये होणारे रासायनिक बदल

शरीराचे वजन योग्य राखण्यासंदर्भात जे लोक काटेकोर असतात, त्यांनी हिवाळ्यात काही गोष्टींकडे नक्कीच लक्ष दिले पाहिजे. या काळात जास्त भुक लागत असल्याने तुमचे वजन वाढण्याची शक्यता असते. तर दुसरीकडे, शरीरातील काही अंतर्गत बदलांमुळेही वजनात वाढ होऊ शकते. एटीएलपीएल नावाचे एक रसायन आपल्या शरीरात चरबी जमा करण्याचे काम करत असते. कोलोरॅडो विद्यापीठाच्या संशोधनानुसार, हिवाळ्याच्या दिवसांमध्ये या रसायनाचा स्तर दुपटीने वाढतो. त्यामुळे या दिवसांमध्ये व्यायाम करण्याचा कालावधी वाढवा.



# हिवाळ्यात बद्धकोष्ठतेचा त्रास होतोय?



**इतर कोणत्याही हवामानापेक्षा हिवाळ्यामध्ये आपले शरीर अधिक सुस्तावलेले असते. त्यामुळे फार व्यायाम किंवा हालचाल होत नाही. त्यासोबतच तेलकट, चटपटीत पदार्थांचे सेवनसुद्धा अधिक प्रमाणात केले जाते. त्यामुळे अशा लहान लहान सवयीचा वाईट परिणाम तुमच्या आरोग्यावर होतो. पाणी कमी पिणे, फायबरयुक्त पदार्थांचे सेवन न करणे, अरबट-चरबट पदार्थ खाणे आणि असे असतानाही कोणत्याही प्रकारची हालचाल न करता, सुस्त पडून राहण्याचा चुकीचा परिणाम तुमच्या पचनसंस्थेवर होतो. परिणामी पोट साफ न होणे आणि बद्धकोष्ठता यांसारख्या समस्या उद्भवतात.**

हिवाळ्यातील थंड हवेमुळे आपल्या दैनंदिन सवयींमध्ये बदल होत असतो. शरीरात ऊब आणि ऊर्जा निर्माण होण्यासाठी सतत गरम पेयांचे सेवन केले जात असते. परंतु, अशा वातावरणात काही सवयींमुळे आपल्या पोटामध्ये बिघाड होऊन, पचनाच्या समस्या निर्माण होतात. परिणामी पोट साफ होत नाही किंवा बद्धकोष्ठतेचा त्रास होतो.

## पाच सवयींमुळे होऊ शकते बद्धकोष्ठता

- कमी पाणी पिणे : हिवाळ्यात फार तहान लागत नसल्याने आपोआप पाणी पिण्याचे प्रमाण कमी होऊ लागते. परिणामी शरीर डिहायड्रेट होते. इतर दिवसांप्रमाणे थंडीच्या दिवसांतही पाणी पिण्याकडे लक्ष देणे गरजेचे असते. असे न केल्यास पचनक्रियेत अडथळा निर्माण होऊन, मलविसर्जनास त्रास होतो. हा त्रास टाळण्यासाठी सतत पाणी पित राहावे. तहान लागली नसली तरीही थोड्या थोड्या अंतराने एक-दोन घोट पाणी प्यावे.
- आहारातील फायबरचे प्रमाण : थंड हवेत अनावश्यक पदार्थ आणि आरोग्यासाठी उपयुक्त नसलेले पदार्थ खाण्याचे प्रमाण वाढते. आहारातील फायबरचे प्रमाण कमी झाल्याने पचनव्यवस्थेच्या कामात अडथळा निर्माण होतो. परिणामी पोट साफ होत नाही. असे होऊ नये यासाठी सकस आहार घेणे गरजेचे असते. त्यामुळे आहारात फायबरयुक्त फळे, भाज्या आणि धान्यांचा वापर करावा.
- शारीरिक हालचाल : हवेतील गारव्यामुळे बरेच जण घरी राहणे पसंत करतात. अशा वेळेस व्यायामाची सवय नसेल आणि बैठे काम असेल, तर शरीराची फारशी काही हालचाल होत नाही. आपल्या पचनसंस्थेसाठी जशी पाणी आणि फायबरयुक्त आहाराची आवश्यकता असते, तशाच शारीरिक हालचालीसुद्धा तेवढ्याच महत्त्वाच्या असतात. त्यामुळे काही मिनिटांसाठी तरी हलका व्यायाम, योगा यांसारख्या गोष्टी करा.
- कॅफिनचे प्रमाण : थंडीच्या दिवसांमध्ये शरीराला ऊब देणारी चहा, कॉफी यांसारखी गरम पेये आपण हमखास पित असतो. परंतु, या पदार्थांच्या अतिरिक्त सेवनामुळे डिहायड्रेशन होऊ शकते. या पदार्थांमध्ये असणाऱ्या कॅफिन आणि इतर काही घटकांमुळे शरीरातील पाण्याची पातळी कमी होऊन डिहायड्रेशन होऊ शकते. परिणामी बद्धकोष्ठतेचा त्रास होऊ शकतो. त्यामुळे आपण दिवसभरात किती कप चहा आणि कॉफी यांसारखे पदार्थ तुम्ही पीत आहात यावर लक्ष ठेवा.
- प्रकिया केलेल्या पदार्थांचे सेवन : शक्य तितक्या रिफाईंड आणि प्रक्रिया केलेल्या पदार्थांचे सेवन करणे टाळा. या पदार्थांच्या सेवनानेदेखील पोट साफ न होण्याची तक्रार निर्माण होऊ शकते. फायबरयुक्त पदार्थ खाणे, योग्य प्रमाणात पाणी पिणे, व्यायाम आणि वेळोवेळी बाथरूमला जाऊन येणे, यांसारख्या लहान लहान सवयी जर तुम्ही वेळीच लावून घेतल्यात, तर तुम्हाला बद्धकोष्ठतेसारख्या समस्यांना सामोरे जावे लागणार नाही आणि हा हिवाळा तुमच्या शरीर आणि पोटासाठी आरोग्यदायी ठरू शकतो.



## हिवाळ्यात सतत सर्दी, खोकला होण्याची कारणं

**हिवाळ्यात होणाऱ्या वातावरणातील बदलामुळे सर्दी, खोकला अशा आजरांनी अनेकजण त्रस्त असतात. हिवाळ्यात पडणारे धुके, प्रदूषण, थंडीचे वातावरण यामुळे आजार आणखी बळावतात. पण या कारणांसह आणखी काही कारणांमुळेही हिवाळ्यात सर्दी खोकल्याचा त्रास होतो, जो टाळता येऊ शकतो. कोणती आहेत ती कारणं जाणून घ्या**

- झोप पूर्ण न होणे : निरोगी राहण्यासाठी ८ तासांची झोप घेणे आवश्यक असते. झोप पूर्ण न झाल्यास रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होऊ शकते. यामुळे सामान्य सर्दीचे गंभीर स्वरूप होऊ शकते.
- धूम्रपान : धूम्रपान करणाऱ्या व्यक्तीला हिवाळ्यात सर्दी, खोकल्याचा सर्वाधिक त्रास होऊ शकतो. याचा आरोग्यावरही परिणाम होतो. त्यामुळे अशा व्यक्तींनी निरोगी राहण्यासाठी धूम्रपान टाळावे.
- स्वच्छता न राखणे : हिवाळ्यात सर्दी, खोकला अशा आजरांची साथ पसरते. त्यामुळे स्वच्छता न ठेवल्यास लगेच असे आजार होऊ शकतात, आजार बळावूही शकतात. त्यामुळे बाहेरून आल्यानंतर, खाण्यापुर्वी हात स्वच्छ धुण्याची सवय लावा, तसेच खोकताना, शिंकताना तोंड व नाक झाका. तुमच्यामुळे इतरांना संसर्ग होणार नाही याची काळजी घ्या.
- तणाव : तणावाचा फक्त मानसिक आरोग्यावरच नाही तर शारीरिक आरोग्यावरही प्रभाव पडतो. यामुळे रोगप्रतिकारक शक्ती कमी होते, ज्यामुळे सर्दी होण्याचा धोका वाढतो.



# हिवाळ्यात लहान मुलांची काळजी कशी घ्यावी

**हिवाळ्यात थंडी जस-जशी वाढत जाते तस-तशी ती झेलणे अवघड होऊन जाते. यात लहान मुलांसाठीही थंडी खूप त्रासदायक असते. विशेषतः ज्या लहान बाळांना पहिल्यापासूनचं सर्दी, खोकल्याचा त्रास आहे ते ही थंडी सहन करु शकत नाही. या हंगामात सर्दी, खोकला आणि विविध विषाणूंचा लोकांना खूप त्रास होत असतो. त्यामुळे आपल्याबरोबरच लहान बाळांचीही खूप काळजी घेणे आवश्यक आहे. कारण नवजात बालकांची रोग प्रतिकारशक्ती खूप कमकुवत असते. अशावेळी हिवाळ्यात लहान मुलांची काळजी कशी घ्यावी हे जाणून घेऊ...**

- घरातील वातावरण उबदार ठेवा : बाळाचे थंडीपासून संरक्षण करण्यासाठी घरातील वातावरण उबदार ठेवा. जर खूपच जास्त थंडी असेल तर तुम्ही घरात हीटर वापरु शकता. पण हीटर वापरताना तो जास्त वेळ चालू राहणार नाही याची काळजी घ्या. तसेच लहान मुलांपासून तो दूर ठेवा. थंडीच्या दिवसात दारं, खिडक्या शक्यतो बंद ठेवा.
- उबदार कपडे घाला : हिवाळ्यात बाळाला उबदार कपडे घाला. जाड स्वेटरऐवजी तुम्ही बाळाला थोडे हलके पण उबदार कपडे घाला, ज्यामुळे ते जास्त चिडचिड करणार नाही आणि थंडीपासूनही त्यांचे संरक्ष होईल. हिवाळ्यात पालकांनी बाळाच्या कपड्यांबाबत विशेष काळजी घेतली पाहिजे.
- कोमट तेलाना मसाज करा : बाळाचे थंडीपासून संरक्षण करण्यासाठी रोज त्याला तेलाने मसाज करा. दररोज कोमट तेलाने मालिश केल्यास स्नायू मजबूत होतात. याबरोबर त्याचे शरीरही उबदार राहते. यामुळे तुमही मोहरीचे तेल किंवा तूप वापरू शकता.
- थंडी लागणार नाही याची काळजी घ्या : हिवाळ्यात मुलाला थंड गोष्टींपासून दूर ठेवा. याशिवाय स्तनपान करणाऱ्या महिलांनी थंड पदार्थ खाणे टाळले पाहिजे.
- स्वच्छतेची काळजी घ्या : बाळांना विविध आजारांपासून दूर ठेवण्यासाठी स्वच्छतेची विशेष काळजी घ्या. कारण घाणीमुळेही बाळ आजारी पडू शकते. अशा परिस्थितीत बाळाला व्हायरल इन्फेक्शनपासून सुरक्षित ठेवण्यासाठी योग्य वेळी लसीकरण करा. तसेच सॅनिटायझरचा वापर करा.

# गडचिरोलीत सर्वाधिक ६३ टक्के मतदान

## अतिसंवेदनशील आणि नक्षलग्रस्त भाग असल्यामुळं ३ वाजेपर्यंतच मतदान

**गडचिरोली :** संपूर्ण महाराष्ट्रात ७ ते ५ वाजेपर्यंत मतदानाची प्रक्रिया असली तरी गडचिरोली जिल्ह्यात सकाळी ७ ते दुपारी ३ वाजेपर्यंत मतदानाची प्रक्रिया पार पडली आहे. गडचिरोली जिल्हा हा अतिसंवेदनशील आणि नक्षलग्रस्त जिल्हा असल्यामुळं सुरक्षेच्या दृष्टिकोतून गडचिरोली जिल्ह्यात ७ ते ३ वाजेपर्यंत मतदानाची प्रक्रिया पार पडत असते.

गडचिरोली जिल्ह्यातील तीन विधानसभा मतदारसंघात सकाळी ७ ते १:३० वाजेपर्यंत गडचिरोली विधानसभा ४९:१७ टक्के, आरमोरी विधानसभा ५१:०५ टक्के, अहेरी विधानसभा ५२:८४ टक्के मतदान झाले.



सकाळी ७ वाजल्यापासून मतदानाला सुरुवात झाली आहे. दुपारी १ वाजेपर्यंत राज्यात सरासरी ३२.१८ टक्के मतदान झाले आहे. जाणून घेऊयात कोणत्या जिल्ह्यात किती टक्के मतदान झाले.

आत्तापर्यंत सर्वात कमी मतदान हे मुंबई शहरात झाले आहे. मुंबई शहरात फक्त २७.७३ टक्के मतदान झाले आहे. सायंकाळी पाच वाजेपर्यंत तमतदानाचा हक्क बजावता येणार आहे. त्यामुळं यामध्ये आणखी वाढ होऊ शकते. लोक हळूहळू मतदानासाठी बाहेर पडत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. तर दुसऱ्या बाजूला गडतिरोली जिल्ह्यात आत्तापर्यंत सर्वाधिक मतदानाची नोंद झाली आहे. गडचिरोली जिल्ह्यात दुपारी १ वाजेपर्यंत ५०.८९ टक्के मतदानाची नोदं झाली आहे. मतदानाच्या बाबतीत आत्तापर्यंत गडचिरोली जिल्ह्यानं मोठी आघाडी घेतली आहे. दरम्यान, यासंकाळी पाच वाजेपर्यंत मतदानाचा हक्क बजावता येणार आहे. त्यामुळं यामध्ये आणखी वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

### १११ वर्षांच्या आजीने केले उत्साहात मतदान

गडचिरोलीमध्ये १११ वर्षांच्या आजीने मतदान केंद्रावर जाऊन मतदान केलं. यावेळी शालेय विद्यार्थ्यांकडून आजीवर फुलांचा वर्षाव करण्यात आला. तर प्रशासनाकडून आजींचा शाल-श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. फुलमती बिनोद सरकार असे त्या आजींचे नाव असून त्या मुलचेरा तालुक्यातील गोविंदपूर येथील रहिवासी आहेत. फुलमती सरकार यांचा जन्म १ जानेवारी १९१३ रोजी झाला.

# बीडमध्ये मतदान केंद्रावरच उमेदवाराचा मृत्यू

**बीड :** राज्यातील बीड जिल्ह्यात विधानसभा निवडणुकांची रणधुमाळी सुरू असताना काही मतदारसंघात गोंधळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या परळी मतदारसंघातील घाटनांदूर येथे राडा झाल्याचं पाहायला मिळालं, त्यानुसार तीन मतदान केंद्रावर १ तास मतदान यंत्रणा बंद होती. त्यामुळे, बीड जिल्ह्यातील मतदानाचा दिवस चांगलाच चर्चेत आला आहे. एकीकडे राड्यामुळे बीड जिल्हा चर्चेत असतानाच, दुसरीकडे बीड विधानसभा मतदारसंघातून एक दुर्दैवी आणि धक्कादायक घटना समोर आली. बीड विधानसभा मतदारसंघाचे अपक्ष उमेदवार बाळासाहेब शिंदे यांचा मतदान केंद्रावरच हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाला आहे. आपल्या उमेदवाराचा मृत्यू झाल्याने कार्यकर्त्यांना मोठा धक्का बसला आहे.

बाळासाहेब शिंदे बीड विधानसभा मतदारसंघातून अपक्ष निवडणूक लढवत होते. त्यामुळे, आज मतदानाच्यादिवशी ते बीड शहरातील छत्रपती शाहू विद्यालयात असणाऱ्या मतदान केंद्रावर थांबले होते. यादरम्यान त्यांना चक्कर आली अन् ते खाली पडले. त्यानंतर, कार्यकर्त्यांनी त्यांना तात्काळ बीड शहरातील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र, तिथून त्यांना छत्रपती संभाजी नगर येथील रुग्णालयात नेण्यात आले. पण, डॉक्टरांनी त्यांना मयत घोषित केलं.

दरम्यान, या दुर्दैवी घटनेने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. शिंदे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून उमेदवार शिंदे यांच्या कार्यकर्त्यांनाही या घटनेनं मोठा धक्का बसला आहे.

बीड विधानसभा मतदारसंघात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा सामना असतानाही दोन अपक्ष उमेदवारांचा अर्ज आल्याने ही निवडणूक चौरंगी होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस महाविकास आघाडीकडून संदीप क्षीरसागर यांना उमेदवारी देण्यात आली असून राष्ट्रवादी काँग्रेस महायुतीकडून योगेश क्षीरसागर निवडणूक लढवत आहेत. या दोन्ही पक्षाच्या उमेदवारांना दोन अपक्षांचे आव्हान असणार आहे. त्यामध्ये, मनोज जरांगे पाटील समर्थक अशी ओळख असलेल्या अनिल जगताप हेही निवडणूक लढवत आहेत. तर, मराठा आरक्षणासाठी दीर्घकाळ लढा देणाऱ्या विनायक मेटे यांच्या पत्नी ज्योती मेटे याही अपक्ष उमेदवार आहेत.

# पैसे वाटपाच्या संशयावरून हाणामारी

**मुंबई:** विधानसभा निवडणूक मतदान प्रक्रिया संपण्यास काही तास राहिले असता स्वराज्य पक्ष आणि भाजप कार्यकर्त्यात हाणामारी झाली आहे. सेक्टर पाच येथील माजी नगरसेवक शंकर मोरे यांच्या कार्यालयासमोर सदर प्रकार घडला असून अद्याप कोणावर अटकेची कारवाई झालेली नाही. मतदान संपण्यास काही तास राहिले असता भाजपा उमेदवार गणेश नाईक यांचे समर्थक माजी नगरसेवक शंकर मोरे यांच्या कार्यालयातून पैसे वाटप होत असल्याच्या संशयावरून स्वराज पक्षाचे उमेदवार अंकुश कदम यांचे कार्यकर्ते निवडणूक आयोगाच्या भरारी पथकासह सेक्टर पाच येथील मोरे यांच्या कार्यालयात दाखल झाले.

# सात पोलीस तडकाफडकी निलंबित; निवडणूक आयोगाची कारवाई

**नवी दिल्ली:** महाराष्ट्र आणि झारखंड या दोन राज्यात विधानसभेसाठी आज (२० नोव्हेंबर) मतदान पार पडले आहे. या मतदानानंतर निवडणुकीचा निकाल २३ नोव्हेंबर रोजी लागणार आहे. मात्र, या निवडणुकीबरोबर उत्तर प्रदेशमधील नऊ विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणुकीसाठी मतदान पार पडले. त्यामुळे उत्तर प्रदेशमध्येही निवडणुकीची रणधुमाळी सुरु आहे. मात्र, अशातच सात पोलिसांना तडकाफडकी निलंबित करण्याची कारवाई करण्यात आली आहे.

उत्तर प्रदेश पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने केलेल्या कारवाईच्या पार्श्वभूमीवर समोर आलेल्या माहितीनुसार, मतदारांना तपासण्यासाठी आणि निवडणुकीच्या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन केल्या प्रकरणी सात पोलीस कर्मचाऱ्यांना निलंबित करण्याचे आदेश निवडणूक आयोगाने दिले असल्याची माहिती समोर आली आहे. यासंदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे. माहितीनुसार, कानपूरमध्ये दोन, मुझफ्फरनगरमध्ये दोन आणि मुरादाबादमध्ये एका पोलिसाला निलंबित करण्यात आलं आहे. तसेच तिघांना मुरादाबादमधील ड्युटीवरून हटवण्यात आलं आहे. दरम्यान, निवडणूक आयोगाकडून निवडणूक अधिकाऱ्यांना मतदान प्रक्रिया निष्पक्ष आणि सुरळीत पार पाडण्यासाठी सूचना देण्यात आलेल्या आहेत. मात्र, समाजवादी पक्षाने आपल्या अधिकृत सोशल मीडिया अकाउंटवर उत्तर प्रदेशमधील काही मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीत काही समुदायांना मतदान करण्यापासून रोखल्याबद्दल तक्रार केली होती. या तक्रारींची दखल घेत निवडणूक आयोगाने ही कारवाई केली आहे.

सपा प्रमुख अखिलेश यादव यांनी सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर केला आहे. त्यामध्ये एक पोलीस कर्मचारी मतदाराची स्लिप फाडत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यानंतर कानपूरमधील दोन अधिकाऱ्यांना निलंबित करण्यात आलं आहे. या अधिकाऱ्यांनी मतदाराला परत पाठवल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला होता. दरम्यान, याची आयोगाने गंभीर दखल घेत ही कारवाई केली असल्याचं सांगण्यात येत आहे. दरम्यान, यानंतर निवडणूक आयोगाने म्हटलं की, ''कोणत्याही पात्र मतदाराला मतदान करण्यापासून रोखले जाऊ नये. मतदानादरम्यान कोणत्याही प्रकारची पक्षपाती वृत्ती खपवून घेतली जाणार नाही. तक्रार आल्यानंतर त्वरित तपास केला जाईल. कोणी दोषी आढळल्यास, कठोर कारवाई केली जाईल,'' असं निवडणूक आयोगाने म्हटले आहे.

# आचारसंहिता भंगाच्या १०१३४ तक्रारी निकाली

## ७०६ कोटी ९८ लाख रुपयांची मालमत्ता जप्त

**मुंबई:** विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी १५ ऑक्टोबर ते २० नोव्हेंबर २०२४ दरम्यान राज्यभरात सी-व्हिजिल पवर एकूण १० हजार १३९ तक्रारी प्राप्त झाल्या. त्यापैकी १० हजार १३४ तक्रारी निवडणूक आयोगाकडून निकालीकाढण्यात आल्या आहेत, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने दिली आहे.



सी-व्हिजिल पद्वारे नागरिक आचारसंहितेच्या उल्लंघनाबाबत तक्रार दाखल करू शकतात. हे प कोणत्याही पस्टोअरमधून डाउनलोड करता येते. तक्रार दाखल झाल्यानंतर संबंधित पथकाद्वारे चौकशी करुन योग्य ती कारवाई करण्यात येते.

राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध अंमलबजावणी यंत्रणांनी १५ ऑक्टोबरपासून बेकायदा पैसे, दारू, अमली पदार्थ, मौल्यवान धातू आदींच्या विरोधात केलेल्या कारवाईत एकूण ७०६ कोटी ९८ लाख रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे.

# छत्तीसगडमध्ये व्याघ्रप्रकल्प देशातील तिसरा क्रमांकाचा मोठा प्रकल्प ठरणार

**मुंबई:** देशातील ५६वा व्याघ्रप्रकल्प म्हणून छत्तीसगडमधील गुरु घासीदास-तमोर पिंगळा व्याघ्रप्रकल्पासाठी अधिसूचना नुकतीच प्रसिद्ध करण्यात आली आहे. आंध्रप्रदेशातील नागार्जुनसागर श्रीशैलम व्याघ्रप्रकल्प आणि आसाममधील मानस व्याघ्र प्रकल्पानंतर हा देशातील तिसरा मोठा व्याघ्रप्रकल्प ठरणार आहे.

गुरू घासीदास-तमोर पिंगळा व्याघ्रप्रकल्प दोन हजार ८२९ चौरस किलोमीटरमध्ये पसरला आहे. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाच्या सल्ल्यानुसार, छत्तीसगड सरकारने मनेंद्रगड-चिरमिरी-भरतपूर, कोरिया, सूरजपूर आणि बलरामपूर जिल्ह्यांमधील गुरू घसीदास तमोर पिंगळा व्याघ्रप्रकल्पाला अधिसूचित केले आहे. या व्याघ्रप्रकल्पातील दोन हजार ४९.२ किलोमीटरचा भाग गाभा क्षेत्राचा आहे. त्यात गुरू घासीदास राष्ट्रीय उद्यान आणि तमोर पिंगळा वन्यजीव अभयारण्य यांचा समावेश आहे. ७८०.१५ चौरस किलोमीटरचे बफर क्षेत्र आहे. नवीन अधिसूचित व्याघ्रप्रकल्प मध्यप्रदेशातील संजय डुबरी व्याघ्रप्रकल्पाशी संलग्न असून तेथे सुमारे चार हजार ५०० चौरस किलोमीटरचे 'लँडस्केप कॉम्प्लेक्स' तयार करण्यात येत आहे.

व्याघ्रप्रकल्प पश्चिमेला मध्यप्रदेशातील बांधवगड व्याघ्रप्रकल्पाशी आणि पूर्वेला झारखंडमधील पलामाऊ व्याघ्रप्रकल्पाशी जोडलेला आहे. राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाने ऑक्टोबर २०२१मध्ये गुरू घासीदास तमोर पिंगळा व्याघ्रप्रकल्पाला अधिसूचित करण्यासाठी अंतिम मान्यता दिली होती. छोटा नागपूरच्या पठारावर आणि काही प्रमाणात बघेलखंडच्या पठारावर वसलेल्या व्याघ्र प्रकल्पाला विविध भूप्रदेश, घनदाट जंगले, नाले आणि नद्यांचा आशीर्वाद लाभला आहे, जो समृद्ध वन्य विविधतेला आश्रय देण्यास अनुकूल आहे आणि त्यात वाघांसाठी गंभीर अधिवास आहेत. भारतीय प्राणीशास्त्र सर्वेक्षणाद्वारे गुरू घसीदास तमोर पिंगळा व्याघ्रप्रकल्पातून ३६५ अपृष्ठवंशी आणि ३८८ पृष्ठवंशीयांसह एकूण ७५३ प्रजातींचे दस्तऐवजीकरण करण्यात आले आहे.

पृष्ठवंशीय प्राण्यांमध्ये पक्ष्यांच्या २३० प्रजाती आणि सस्तन प्राण्यांच्या ५५ प्रजाती समाविष्ट आहेत. यात दोन्ही गटांमधील अनेक धोक्यात असलेल्या प्रजातींचा समावेश आहे. त्यामुळे आता छत्तीसगडमध्ये चार व्याघ्रप्रकल्प होणार असून . हे प्रकल्प राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणाकडून चालू असलेल्या तांत्रिक आणि आर्थिक सहाय्याने प्रजातींचे संरक्षण मजबूत करण्यास बांधील आहेत.

# निवडणुकीच्या ३६ दिवसांत ३५ लाख लिटर दारू जप्त

**मुंबई:** विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेच्या काळात राज्य उत्पादन शुल्क विभागाने जप्त केलेल्या दारूचे आकडे पाहिले तर तुमचे डोळे सक्रावतील.राज्य उत्पादन शुल्क विभागाने यंदा रेकॉर्डब्रेक दारू जप्त केलीय.

विधानसभा निवडणुक जिंकून सत्तेच्या सिहांसनावर बसायला उतावीळ झालेल्या राजकारण्यांनी प्रचारात 'मोफतबाजी'चा सपाटा लावलाय... मतदारांना आकर्षित करण्यासाठी या मंडळींनी आपला हात मोकळासोडलाय..चोरी-चोरी छुपके छुपके प्रचारात दारु ओतणाऱ्यांची झिंग राज्य उत्पादन शुल्क विभागाने उतरवलीय. गेल्या ३०-३५ वर्षांत यंदा पहिल्याच 'एक्साइज'च्या हाती रेकॉर्ड ब्रेक दारु लागलीय.जेमतेम ३६ दिवसांत या खात्याला ३९ कोटी ६७ लाख रुपयांची दारु जप्त करण्यात आलीय. ३६ दिवसांत तब्बल ३५ लाख लिटर दारू जप्त करण्यात आली आहे. जप्त केलेल्या दारूची किंमत तब्बल ३९ कोटी ६७ लाख रुपये इतकी आहे. यात विदेशी दारू १ लाख १३ हजार लिटर इतकी होती. हातभट्टीची दारू २ लाख २० हजार लिटर इतकी होती. गावठी दारूसाठीचा माल - २४ लाख ७५ हजार लिटर,स्पिरीट - ४४ हजार ३०० लिटर, ताडी - ३३ हजार लिटर,भांग - ३ हजार किलो, परराज्यातील दारू - ४१ हजार लिटर इतकी होती.

२०१९ च्या विधानसभा निवडणुकीच्या आचारसंहितेच्या काळात राज्य उत्पादन शुल्क विभागाने केलेल्या कारवाईवरनजरटाकल्यानंतर आपल्याला २०२४ च्या निवडणुकीत कसा दारूचा महापूर सुरू आहे याचा अंदाज आपल्याला येईल. विधानसभा निवडणूक २०१९ मध्ये १३ कोटी ३७ लाख रुपयांची दारू एक्साईज विभागाने जप्त केली होतीतर नुकत्याच झालेल्या २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या ७५ दिवसांच्या आचारसंहितेच्या काळात तब्बल ३७ कोटी ६४ लाख रुपयांची दारू उत्पादन शुल्क विभागाने जप्त केली होती. विधानसभा निवडणुकीत मतदारांना आकर्षित करण्यासाठी राजकीय पक्ष त्यांचे उमेदवार एक ना अनेक प्रकारची प्रलोभनं दाखवताना पाहायला मिळतात. त्यात दारूची झिंग काही या निवडणुकीत नवी नाहीय.. मात्र २०२४ च्या विधानसभेच्या निवडणुकीत जप्त केलेल्या दारुचा रेकॉर्डब्रेक आकडा पाहिला तर आपल्यालाही काही सेंकंद का होईना झिंगल्यासारखं होईल.

# तीन पिढ्यांनी केले एकत्रित मतदान

**मुंबई:** मतदानाकडे तरुणाईचा कल कमी असताना घाटकोपरमध्ये तीन पिढ्यांनी एकत्रित मतदान केले. राज्याच्या विकासासाठी सर्वांनी मतदान करायलाच हवे, असे आवाहन त्यांनी केले.

घाटकोपरमधील राजावाडी येथील चित्तरंजन क्रीडांगण येथे दुपारी १२.३० च्या सुमारास बाबुराव दगडू वाणी (९२) यांनी मतदान केले. यावेळी त्यांच्यासोबत त्यांचे पुत्र प्रकाश वाणी (६३) आणि त्यांचा नातू आदित्य वाणी (३०) यांनीही मतदान केले. आजोबा, मुलगा आणि नातू या तिघांमध्ये ३० वर्षांचे अंतर आहे. मतदान आपले कर्तव्य आहे आणि ते प्रत्येकाने बजावायलाच हवे, असे मत बाबुराव वाणी यांनी व्यक्त केले. आजोबा सकाळपासून मतदान करण्यासाठी मागे लागले होते.

# मतदान केंद्रच बदलले; मतदारयादीतील घोळामुळे दिव्यांग मतदारांना नाहक त्रास

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीच्या मतदानासाठी मतदारांना मतदान केंद्रावर पोहोचविण्यासाठी राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांची बुधवारी धावपळ सुरू होती. तर दुसरीकडे बहुसंख्य मतदारांच्या घरी मतदार माहिती चिठ्ठी पोहोचली नसल्यामुळे मतदान केंद्रात पोहोचल्यानंतर अनेकांना आपला अनुक्रमांक व नाव मतदारयादीत शोधण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागत होती. दादर माहीम विधानसभा मतदारसंघातील प्रभादेवीमधील खेड गल्लीतील मुंबई पब्लिक स्कूल मतदान केंद्रावर जाऊन लोकसभा निवडणुकीसाठी मतदान केले; मात्र विधानसभा निवडणुकीसाठी मतदान करण्याकरिता तेथे आल्यानंतर आपले मतदान केंद्र बदलल्याचे समजले. त्यामुळे दिव्यांग महिलेला एका मतदान केंद्रावरून दुसऱ्या मतदान केंद्रापर्यंत पायपीट करावी लागली. मुंबईत ठिकठिकाणच्या मतदारसंघात मतदारयादीत त्रुटी पाहायला मिळत आहेत. प्रभादेवी दादर परिसरात राहणाऱ्या दिव्यांग मतदार संगीता भास्कर राणे यांनी सहा महिन्यांपूर्वी विधानसभा निवडणुकीसाठी प्रभादेवीमधील खेड गल्ली येथील मुंबई पब्लिक स्कूल मतदान केंद्रावर येऊन मतदान केले होते. विधानसभा निवडणुकीसाठी त्या आज त्याच मतदान केंद्रावर आल्यानंतर मतदान केंद्र बदलल्याचे त्यांना समजले. यासंदर्भात कोणतीही पूर्वकल्पना मिळाली नसल्यामुळे मनःस्ताप सहन करावा लागल्याचे संगीता राणे यांनी सांगितले. त्यांचे मतदान केंद्र आता खेडगल्लीऐवजी गोखले रोडवरील मुंबई महानगरपालिकेच्या शाळेत असल्याचे मतदान केंद्रावरील अधिकाऱ्यांनी सांगितले. त्यामुळे त्यांना चांगलाच मनःस्ताप सहन करावा लागला. मात्र मतदानाचा हक्क बजावण्यासाठी त्यांनी गोखले रोडवरील महापालिकेची शाळा गाठली.

# भाजपाला पाठिंबा दिला म्हणून तरुणीचा खून; उत्तरप्रदेश मधील घटनेने खळबळ

**नवी दिल्ली:** महाराष्ट्र आणि झारखंड राज्यात विधानसभा निवडणूक होत असताना आज उत्तर प्रदेशमध्ये विधानसभेसाठी पोटनिवडणूक होत आहे. महाराष्ट्रात एकीकडे मतदानादरम्यान गोंधळाची परिस्थिती दिसत आहे. अनेक ठिकाणी उमेदवारांवर हल्ले करण्यात आले आहेत. तर काही ठिकाणी पैसे वाटपाच्या घटना घडल्यामुळे तणाव निर्माण झाला आहे.

उत्तर प्रदेशच्या करहळ येथेही अशीच घटना घडली असून एका दलित तरुणीचा निर्वस्त्र अवस्थेतील मृतदेह बॅगेत आढळून आला आहे. या घटनेमुळे मैनपूरी जिल्ह्यातील करहळ विधानसभेत खळबळ माजली आहे. मृत तरुणीच्या आईने या घटनेनंतर समाजवादी पक्षावर आरोप केला आहे. प्रशांत यादव नामक व्यक्तीने माझ्या मुलीचा राजकीय वैमनस्यातून खून केल्याचा आरोप केला आहे. मृत तरुणीच्या आईने पुढे म्हटले की, माझ्या मुलीचा खून करण्यापूर्वी तिच्यावर बलात्कार करण्यात आला होता. माझ्या मुलीने भाजपाला मतदान करण्याचा निर्णय बोलून दाखविल्यामुळे प्रशांत नाराज होता. जर तिने समाजवादी पक्षाला मतदान केले नाही तर परिणामांना सामोरे जावे लागेल, अशी धमकी तिला देण्यात आली होती.

मृत तरूणीच्या कुटुंबियांनी दिलेल्या माहितीनुसार, १९ नोव्हेंबर रोजी तिला जीवे मारण्याची धमकी देण्यात आली होती. दोन प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, काल (१९ नोव्हेंबर) दुचाकीवरून आलेल्या दोघा जणांनी तरूणीला बळजबरीने दुचाकीवर बसवून पळवून नेले. त्यानंतर आज तिचा मृतदेह आढळून आला. पोलिसांना मृतदेहाची माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली आणि प्राथमिक तपास सुरू केला.

# केरळमध्ये भारतातील पहिले ऑनलाईन कोर्ट सुरू; २४ तास होणार सुनावणी

**नवी दिल्ली:** भारताचे पहिले ऑनलाईन कोर्ट केरळ राज्यातील कोल्लम जिल्ह्यात सुरु झालेले आहे. देशातील पहिल्या ऑनलाईन कोर्टाने काम करणे देखील सुरु केलेले आहे. हे कोर्ट दिवसाचे २४ तास चालणार आहे. या महिन्याच्या २० तारखेपासून ऑनलाईन याचिकांच्या सुनावणी देखील सुरु होणार आहे.

देशातील कोर्टात अनेक केसेस सुनावणी अभावी पेंडीग असल्याने न्याय मिळण्यास विलंब होत आहे. अशात देशातील केरळ राज्यातीर कोल्लम येथे देशातील पहिले ऑनलाईन कोर्ट सुरु झालेले आहे. बुधवार २० नोव्हेंबरपासून या



ऑनलाईन कोर्टात सुनावणी सुरु होणार आहे. या कोर्टाची सुनावणी २४ तास सुरु राहणार असल्याने नागरिकांना दिलासा मिळणार आहे. या कोर्टात एक मजिस्ट्रेट आणि तीन कर्मचारी असणार आहेत. या कोर्टात कुठूनही ऑनलाईन केस दाखल करता येणार आहे.

कोर्टाच्या वेबसाईटवर निर्धारित प्रपत्र भरुन ऑनलाईन केस दाखल करता येणार आहे.विशेष म्हणजे सेटलमेंट कायद्यानुसार येथे चेक बाऊन्सची प्रकरणे देखील चालविली जाणार आहेत.या संदर्भात कोल्लम बार असोसिएशन हॉलमध्ये वकील आणि क्लार्कना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.कोर्टाच्या इमारतीतील जनरल कोर्टात होणारी कोणतीही पारंपारिक प्रक्रीया होणार नाही. याचिका दाखल करणाऱ्यांना तसेच वकीला स्वत: कोर्टात हजर राहण्याची गरज राहणार नाही.

वकीलांचा युक्तीवाद, साक्षीदारांचा जबाब आणि सुनावणी संपूर्ण प्रक्रीया ऑनलाईन होणार आहे. पोलिस ठाण्यांना ऑनलाईन पत्र पाठवले जाणार आहे. आरोपी आणि केस दाखल करणाऱ्यांना दोन्ही पक्षांना ऑनलाईन अर्ज दाखल करावा लागणार आहे.ऑनलाईन कोर्टात अपलोड केलेल्या दस्ताऐवजांचा वापर करुन जामीन देखील मिळविता येऊ शकणार आहे. कोर्टात फि देखील ऑनलाईन भरावी लागणार आहे. येथे याचिका दाखल करणाऱ्यांना आणि वकीलांना कोर्टाच्या कामात थेट सहभाग घेता येईल अशी प्रोसेस तयार केली आहे. हे डिजिटल कोर्ट या महिन्याच्या २० तारखेपासून कोल्लम जिल्ह्यातील चार न्यायालयात या प्रकारे प्रकरणांची सुनावणी करणार आहे. या डिजिटल कोर्टाची कार्यप्रणाली पाहून अन्य जिल्ह्यात देखील अशाच प्रकारचे ऑनलाईन कोर्ट सुरु होणार आहे.

# जिवंत व्यक्तीला मृत घोषित केले

**मुंबई:** जिवंत मतदाराला मृत घोषित केल्याची घटना मुंबादेवी मतदारसंघातील एका मतदान केंद्रावर घडली. गोव्याहून खास मतदानासाठी आलेले अँथोनी ब्रिगेन्झा यांच्या नावापुढे मृत असल्याचे दर्शवण्यात आले होते. मात्र अखेर वादावादीनंतर त्यांना मतदान करण्याची परवानगी मिळाली.

मुंबादेवी मतदारसंघातील मुंबई सेंट्रल येथील एका मतदान केंद्रावर ही घटना घडली. मुंबई सेंट्रलच्या बीआयटी चाळीत राहणारे अँथोनी ब्रिगेन्झा हे मतदान केंद्रावर गेले असता तेथील कर्मचाऱ्यांनी त्यांना मतदान करण्यास मनाई केली. मतदार यादीनुसार त्यांना मृत घोषित करण्यात आले होते. हे ऐकून ब्रिगेन्झा यांना प्रचंड धक्काच बसला. त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यास कोणीही तयार नव्हते. याबाबत ब्रिगेन्झा यांनी सांगितले की, मी गोव्याला राहतो. अधूनमधून मुंबईतील घरी येतो. मात्र यावेळी मला मृत घोषित केल्यामुळे धक्काच बसला.


कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रेडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

स्थलांतर
सिटी मॅक्स डिजिटल कलर
मो.7058766021,9422185282
गड्डम मार्केट,पहिला मजला,
शिवाजी नगर,नांदेड

# गोदातीर समाचार

पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस
हर्बल ट्रिटमेंट
१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...
किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.
पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड
मो. 9284804221, 9637704308



## अर्धापुरातील केंद्रावर मतदानावरून वाद

▸ काही काळ मतदान थांबल्याचा आरोप ▸ काँग्रेस समर्थक व भाजप कार्यकर्त्यांमध्ये शाब्दिक चकमक

**अर्धापूर–** भोकर विधानसभा मतदारसंघातील अर्धापूर शहरातील बसवेश्वर शाळेवरील बुथ क्रं. ५४, ५५ वर मतदारांना मतदान करण्यासाठी रोखण्यात आले असल्याचा आरोप महाविकास आघाडीच्या वतीने करण्यात आला. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे लक्षात येताच सहाय्यक पोलीस निरीक्षक विष्णू कराळे यांनी दोन्ही गटांना शांत करत वरिष्ठांना माहिती दिली. वरिष्ठांनी परिस्थिती हाताळल्यानंतर मतदान प्रक्रिया पुन्हा सुरळीत सुरु झाली.



विधानसभेसाठी दि.२० बुधवारी रोजी मतदान सुरू होते. अर्धापूर शहरातील बुथ क्रं.५४ व ५५ वरील कैची समाजाचे मतदार मंगल कार्यालयात असल्याची कुणकुण महाविकास आघाडीचे भोकर विधानसभेचे उमेदवार पप्पू कोंढेकर, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सुनिल वानखेडे यांना लागताच ते मतदारांना घेऊन मतदान केंद्रावर गेले व मतदान अधिकाऱ्यांना टाईम संपत आहे, या मतदारांना चिठ्ठ्या देऊन मतदान करू द्यावे यावरून शाब्दिक चकमक झाली.

परिस्थितीचे गांभिर्य पाहून सहाय्यक पोलीस निरीक्षक विष्णू कराळे यांनी दोन्ही बाजूकडील पदाधिकाऱ्यांना समजावून सांगून परिस्थिती आटोक्यात आणली.

त्यानंतर त्या बुथवर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार, उपविभागीय पोलीस अधिकारी डॅनियल बेन, पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांनी वेळीच हस्तक्षेप केल्याने पुढील अनर्थ टळला. या ठिकाणी वरिष्ठ अधिकारी येऊन थांबलेली मतदान प्रतिक्रिया दोन तासांनी सुरळीत केली आणि मतदान शांततेत पार पडले.

## नांदेड परिक्षेत्राचे उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी सिडकोतील मतदान केंद्राचा घेतला आढावा




**नवीन नांदेड –** नांदेड परिक्षेत्राचे उपमहानिरीक्षक शहाजी ऊमाप यांनी ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत असलेल्या सिडको भागातील शिवाजी हायस्कूल येथील मतदान केंद्रावर आढावा घेऊन पोलीस बंदोबस्ताची पाहणी केली.

नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी व विधानसभा मतदार निवडणूक साठी २० नोव्हेंबर रोजी मतदान घेण्यात आले. ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत असलेल्या सिडको भागातील शिवाजी हायस्कूल या केंद्रांवर भेट देऊन आढावा घेतला व पोलीस बंदोबस्त विषयी माहिती घेतली. सकाळपासूनच ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत उपविभागीय पोलिस अधिकारी सुशीलकुमार नायक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांनी कडेकोट बंदोबस्त ठेवला होता. या ठिकाणी कार्यरत पोलीस निरीक्षक अनंत भंडे यांनी ही माहिती दिली.




**नांदेड** : मतदानाचा हक्क बजावल्यानंतर माजी आ. अनुसया खेडकर, महेश खेडकर, नांदेड दक्षिणचे वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार फारूख अहेमद, नांदेड उत्तरचे 'वंचित'चे उमेदवार इंजि. प्रशांत इंगोले, माजी आ. रोहिदास चव्हाण, लोकसभेचे उमेदवार प्रा. राजू सोनसळे, चैतन्यबापू देशमुख, बाळू खोमणे, प्रविण साले हे दिसत आहेत.

## वेबकास्टिंगच्या माध्यमातून मतदान प्रक्रियेवर करडी नजर

**नांदेड–** जिल्ह्यात लोकसभा पोटनिवडणूक व विधानसभा सार्वत्रिक निवडणुकिची प्रक्रिया आज सकाळपासून सुरू झाली. या दरम्यान संपूर्ण मतदान प्रक्रियेवर वेबकास्टिंगच्या माध्यमातून दिवसभर देखरेख ठेवण्यात आली. नांदेड जिल्हयातील एकूण ३०८८ केंद्रापैकी १७८१ केंद्रावर वेब कॅमेराव्दारे (प्रत्येक केंद्रावर दोन कॅमेरे) निगराणी ठेवली जात होती.






नांदेड जिल्ह्यात नऊ विधानसभा मतदारसंघासाठी ३०८८ हजारांपेक्षा अधिक मतदान केंद्र होते. दरम्यान सकाळी ७ वाजेपासून मतदान सुरू झाल्यानंतर मतदान केंद्रावर वेबकास्टिंगच्या माध्यमातून जिल्हा नियंत्रण कक्षात जिल्हाधिकारी अभिजीत राऊत, अपर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, निवडणूक उपजिल्हाधिकारी राजकुमार माने, प्रशांत शेळके, जिल्हा नियोजन अधिकारी सुधाकर आडे व अन्य अधिका–यांनी मतदान प्रक्रियेवर देखरेख ठेवली. जिल्हाभरात मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली.

## माहूर–किनवट रस्त्यावर बसची दुचाकीला धडक; एक ठार



**नांदेड–** माहूर– किनवट राष्ट्रीय राज्य महामार्गावरील वाई बाजार ते साईनगर फाट्याच्या दरम्यान बस व दुचाकीचा भीषण अपघात झाला. यात एक जण जागीच ठार झाला. ही घटना बुधवार दि. २० नोव्हेंबर रोजी दुपारी घडली.

माहूर–किनवट राष्ट्रीय महामार्गावरील वाई फाटा ते साईनगर दरम्यान हा भीषण अपघात झाला. नागपूर–किनवट बस क्र. (एम.एच. ०६ एस. ८५३२) ही येत होती. त्याचवेळी आसोली येथील फुलसिंग गुलाब चव्हाण (वय ४३) हा वाई बाजारकडून साईनगरच्या दिशेने जात होता. हा अपघात एवढा भीषण होता की, बसने दुचाकीला अक्षरशः ५० फुटांपर्यंत फरफटत नेले. त्यामुळे दुचाकीचालक फुलसिंग गुलाब चव्हाण याचा घटनास्थळावरच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच सिंदखेड पोलीस ठाण्याचे पोलीस कर्मचारी घटनास्थळावर हजर झाले.

घटनास्थळाचा पंचनामा करुन पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविला आहे. याप्रकरणी बस चालकाविरुध्द सिंदखेड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## हदगांवमध्ये ७ लाख ८० हजार रुपयांची रोकड जप्त

**नांदेड–** विधानसभा निवडणुकीत मतदारांना पैसे वाटपाचा जोरदार प्रयत्न सुरु होता. हदगाव येथील नईआबादी भागात मतदारांना पैसे वाटपासाठी आलेल्या एका चारचाकी वाहनातून पोलिसांनी ७ लाख ८० हजार रुपयाची रोख रक्कम जप्त केली आहे. याप्रकरणी दोन जणांना पोलिसांनी अटक केली.

विधानसभेच्या निवडणुकीसाठी मतदारसंघात चुरस निर्माण झाली आहे. हदगावमध्येही दुरंगी लढत होत आहे. मतदारांना खुलेआमपणे पैसे वाटप होत असल्याचे नागरिकांकडून सांगण्यात येते. मंगळवारी सायंकाळी हदगाव पोलिसांचे एक पथक शहरात गस्तीवर असतांना नई आबादी भागात एक कार संशयास्पद जातांना दिसली. पोलिसांनी कारचा पाठलाग करुन कार पकडली. कारमधील जयसिंह धनंजय शिंदे (वय २४) रा. शास्त्रीनगर, नांदेड व अमोल रामराव आडे (वय ३०) रा. देवीनगर तांडा, हदगाव या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेवून कारची तपासणी केली. या कारमध्ये ७ लाख ८० हजार रुपयांची रक्कम पोलीसांना आढळून आली.

या रक्कमे संदर्भात दोघांकडे पोलिसांनी चौकशी केली असता त्यांना समाधानकारक उत्तरे देता आली नाहीत. पोलिसांनी निवडणूक विभागाच्या पथकाला पाचारण करुन पंचासमक्ष ७ लाख ८० हजार रुपयांची रक्कम व कार जप्त केली आहे. याप्रकरणी हदगाव पोलीस ठाण्यात दोन जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## भोकर विधानसभा मतदारसंघात विक्रमी ७५ टक्के मतदान!

### २५ उमेदवारांचे भवितव्य मतदान पेटीत बंद

**भोकर–** भोकर विधानसभा मतदारसंघासाठी पक्षासह अपक्ष एकूण २५ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात उभे आहेत. २० नोव्हेंबर रोजी भोकर मतदारसंघात सुरळीत मतदान प्रक्रिया पार पडली असून सायंकाळी ५ वाजेपर्यंत मतदारसंघातील मतदानाची टक्केवारी ६५ टक्के होती. रात्री उशिरापर्यंत मतदार संघातील सर्व मतदान केंद्रातील अधिकृत माहिती हाती लागली नसल्याने ती टक्केवारी ७५ पर्यंत जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक अनुषंगाने भोकर विधानसभा मतदार संघासाठी एकूण २५ उमेदवार रिंगणात आहेत. यामध्ये काँग्रेस महाविकास आघाडी कडून तिरुपती उर्फ पप्पू पाटील कदम कोंढेकर, भाजप महायुतीकडून माजी मुख्यमंत्री अशोकराव चव्हाण यांची कन्या श्रीजया चव्हाण, वंचित बहुजन आघाडी कडून सुरेश राठोड, जनहित लोकशाही पक्षाकडून नागनाथ घिसेवाड, महाराष्ट्र नवनिर्माण सेना साईप्रसाद जटलवार, बहुजन समाज पार्टी कमलेशकुमार चौदंते, जन जनवादी पार्टी डॉ. अर्जुन राठोड, इंडियन नॅशनल लीग कौसर सुलताना, जनता दल सेक्युलर तिरुपती कदम, रिपब्लिकन सेना दिनेश लोणे, ऑल इंडिया मजलीस ई– न्कलाब ई–मिल्लत मखसूद रज्जाक शेख, राष्ट्रीय समाज पक्ष साहेबराव गोरठकर आदी बारा पक्षांचे बारा उमेदवार आहेत. तर गौतम सावते, चंद्रकांत मुस्तापुरे, जाकीर शेख, दशरथ स्वामी, भीमराव दुधारे, महानंदा मोठेकर, माधव मेकवाड, विलास शिंदे, संतोष गव्हाणे व संभाजी काळे हे अपक्ष उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

भोकर विधानसभा मतदारसंघासाठी निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी भोकर प्रवीण मेंगशेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार भोकर विनोद गुंडमवार, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार अर्धापूर रेणुकादास देवणीकर, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा तहसीलदार मुदखेड आनंद देऊळगावकर यांच्या सहकार्याने २० नोव्हेंबर रोजी रोजी २५ उमेदवारांसाठी भोकर विधानसभा मतदारसंघातील भोकर–मुदखेड–अर्धापूर या तीन तालुक्यांमध्ये ३४४ मतदान केंद्रावर मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली असुन आहे.

सायंकाळी ५ वाजेपर्यंत मतदानाची टक्केवारी ही ६०.२५ टक्के होती. मतदानाची वेळ ठरवून दिली असल्यानेही अनेक मतदान केंद्रावरील मतदान प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत चालू असल्याने संपूर्ण अधिकृत माहिती हाती लागली नसली तरीही मतदान प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत मतदानाची टक्केवारी ही ७५ टक्के पर्यंत जाण्याची शक्यता आहे.

भोकर विधानसभा मतदार संघ निवडणुकीतील २५ उमेदवारांची भवितव्य २० नोव्हेंबर रोजी मतदान पेटीत बंद झाले आहे. शनिवार दि.२३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे.

भोकर विधानसभा मतदार संघासाठी अप्पर पोलीस अधीक्षक खंडेराव धरणे, भोकर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अजित कुंभार, सहाय्यक पोलीस निरीक्षक शैलेंद्र औटे, कल्पना राठोड, पोलीस उपनिरीक्षक राम कराड, सुरेश जाधव, मुदखेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक वसंत टपरे, सहायक पोलीस निरीक्षक बाबासाहेब कांबळे व अर्धापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम आदी पोलीस प्रशासनातील अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली सहकारी पोलीस अधिकारी, कर्मचारी यांच्या सहकार्याने चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला. एकूमच मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड–४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.
फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड–(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४ / मुंबई ९९६७०६२३५४ ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com